# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १६/०२/२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

शनिवार दि.१६ फेब्रवारी २००८ रोजी मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२.४५ वाजता वंदेमातरम या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
०२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
०३. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०४. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०५. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
१०. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
११. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१२. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१३. स.स.श्रीमती आशन्ना लक्ष्मी शंकर
१४. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१५. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१६. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१७. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१८. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१९. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२०. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२१. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२२. स.स.श्रीमती मिराताई रामराव शिंदे
२३. स.स.श्री.काशिनाथ हरीभाऊ कोकाटे
२४. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२५. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२६. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२७. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२८. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अ.कदिर
२९. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन
३०. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३१. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान
३२. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३३. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३४. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३५. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३६. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
३७. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३८. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान

३९. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४०. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४१. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४२. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
४३. स.स.श्री.मोतीवाला अश्रफ म.युनुस
४४. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४६. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
४७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
४८. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
४९. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
५१. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
५२. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५३. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५४. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
५५. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
५६. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
५७. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
५८. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
५९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६०. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
६१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
६२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
६३. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
६४. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
६५. स.स.सौ.अल्पा विकास जैन
६६. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
६७. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.किशोर बाबुलाल तुलशीबागवाले
०३. स.स.श्री.राजेश व्यास

**<u>चर्चा :</u>**

श्री.हिम्मतराव दाभाडे :स.सदस्य श्री.संजय जगताप यांचे वडील स्व.उत्त्तमराव जगताप यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले आहे त्यांना दोन मिनीटे श्रध्दाजंली अर्पण करावी.

सौ.लता दलाल :तसेच थोर समाजसेवक स्व.बाबा आमटे यांचेही निधन झालेले आहे त्यांनाही श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.कैलास गायकवाड :स्व.उत्त्तमराव जगताप यांनी समाजासाठी मोठे काम केलेले आहे त्यांनी मा.वामनदादा कर्डक यांचे सोबत आयुष्य घालविले आहे. त्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास लाभलेला आहे. श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान :
श्री.संतोष जेजूरकर : } यास माझे अनुमोदन आहे.
डॉ.भागवत कराड :

मा.महापौर : सर्वांनी श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

याच वेळी स्व.उत्तमराव जगताप तसेच थोर समाज सेवक स्व.बाबा आमटे यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

| | |
|---|---|
| श्री.मुजीब खान | :प्रभाग कार्यालय क मध्ये दोन वेळा अर्ज देवून मालमत्ता कर घेण्यात यावा म्हणून विनंती केली. २५ हजार मालमत्ता कर भरणा केला होता दुसऱ्या वेळी भरायला गेलो तर कोणीच घेण्यास तयार नाही. विचारणा केली असता रेकॉर्ड बुक मिळत नाही. असे सांगतात पुर्वी २५०००/-भरलेले आहे. कोणीही पाहायला तयार नाही. असे अनेक पुस्तके गेले असतील. |
| मा.महापौर | :या बाबतीत संबंधीत विभागाने माहिती घेवून कार्यवाही करावी. |
| श्री.संतोष जेजूरकर | :विषयपत्रिका घेण्यात यावी. |
| श्री.प्रशांत देसरडा | :विषय पत्रिकेतच प्रश्नोत्तरात दोन प्रश्न विचारले होते प्रभाग कार्यालयात नागरीकांनी कराचे पैसे भरणा केला ते महापालिका फंडात जमा न करता कर्मचाऱ्यांनी बोगस धनादेश लावले ते धनादेश वटले नाही. असे किती धनादेश आलेले असून वटले नाही यादीची मागणी केली होती. १९९८ पासून अनेक धनादेश वटवले नाही महापालिकेने कोणतीही कार्यवाही केली नाही वृत्तपत्र वाल्यांचे आभार त्यांनी लेखा विभागात कसा कारभार चालतो तो दाखवला. मला प्रश्नाचे उत्तर दिले नाही. गंभीर विषय आहे. भरलेले पैसे जमा न करता बोगस चेक लावले. या संदर्भात प्रशासनाने मला उत्तर दिले नाही. नियमावली प्रमाणे चर्चा करता येत नाही. आम्ही रितसर प्रश्न विचारले का उत्तर दिले नाही. या संदर्भात संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कार्यवाही करावी. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | :अधिकारी नगरसेवकांना उत्त्तर देण्याचे टाळाटाळ करतात. नागरीक भरणा करीत असलेली कराची रक्कम जमा होत नसेल व कर्मचारी बोगस चेक लावून देत असतील त्या कर्मचाऱ्यांवर आजच कार्यवाही करण्याचा निर्णय द्यावा. निलंबनाची कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :स.सदस्यांना लेखीउत्तर का देण्यात आले नाही प्रशासनाने खुलासा करावा. |
| मा.आयुक्त | :हा प्रश्न लेखाविभागाशी संबंधीत होता लेखा विभागाने नगरसचिव यांचेकडे त्यांचे प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे याच वेळी एक प्रत स.सदस्य श्री.देसरडा प्रशांत यांना द्यायला पाहिजे होती त्याची प्रत स.सदस्यांना आज नगर सचिव यांनी पुरविलेली आहे. आज लेखा विभागाचे अधिकारी एका ऑडीटच्या संदर्भात साक्ष असल्याने मुंबईला गेलेले आहे. आल्यावर तशी विचारणा करण्यात येईल यानंतर जे प्रश्नाचे उत्तर द्यायचे ते नगरसचिव यांचेकडे दिल्यावर त्याची एक प्रत स.सदस्यांनाही देण्यात येईल. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | :दोन वर्षापासून अशाच प्रकारचे खुलासा ऐकतो आहे. अतिक्रमणाबाबत अनेक वेळा चर्चा झाली कार्यवाही केली नाही. जे अधिकारी निर्णयाची अंमलबजावणी करीत नसतील त्यांचेवर कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :हा विषय गांभीर्याने घेवून स.सदस्यांना उत्तर देणे आवश्यकच होते हे कुठेतरी थांबले पाहिजे. संबधीत अधिकारी यांनी उत्तर का दिले नाही मा.आयुक्तांनी संबंधीत अधिकारी यांना विचारणा करावी व लेखी माहिती सायंकाळपर्यंत माझ्याकडे द्यावी. |
| श्री.हिम्मतराव दाभाडे | : मनमानी कारभार चालू आहे. |
| श्री.संजय सिरसाट | :हा प्रश्न फक्त लेखा विभागाशीच संबंधीत नव्हता नागरीकांनी मालमत्ता कर रोख भरणा केला परंतू त्याबरोबर बोगस चेक दिलेले होते अशी तक्रार केलेली होती. बोगस चेक महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी दिले व जे कुणी मालमत्ता धारक असतील त्यांचे नावाने आजही थकबाकी तशीच आहे. स.सदस्यांनी विचारलेला प्रश्न संपूर्ण क्षेत्रासंबधीत होता बोगस किती धनादेश जमा झालेले आहे याची माहिती मा.आयुक्तांनी मागवून जे कुणी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करून माहिती सभागृहात द्यायला पाहिजे होती. लेखा विभागाचे अधिकारी नसतील तर त्यांचे सहाय्यक असतील हा प्रश्न १५ दिवसापूर्वीच विचारलेला आहे. त्याचे उत्तर आतापर्यंत दिले जात नाही. हा गंभीर प्रश्न होता प्रशासन म्हणून मा.आयुक्तांनी माहिती मागविणे गरजेचे होते प्रशासनाने या संबंधी काय कार्यवाही केली आहे. |

मा.आयुक्त :स.सदस्यांनी विचारलेले प्रश्न प्रशासन गांभीर्याने घेते व जो प्रश्न ज्या विभागाच्या संबंधीत असतो त्याचे उत्तर देणेची जबाबदारी ही विभाग प्रमुख याची असून त्यांनी डायरेक्ट स.सदस्यांना उत्तर देणे अपेक्षीत आहे त्यांचे प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळाले नाही याची मला माहिती नव्हती.

श्री.संजय सिरसाट :प्रश्नाचे उत्तर देणे विभाग प्रमुखाची जबाबदारी असली तरी या प्रकरणात गैरव्यवहार झालेला आहे मा.आयुक्तांची देखिल जबाबदारी नव्हती का.

मा.आयुक्त :स.सदस्यांना प्रश्नाचे उत्तर दिले गेले नाही ही माहिती आताच प्रशासनाच्या समोर आलेली आहे.

श्री.संजय सिरसाट :संबंधीतांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी. तीन दिवसाच्या आत उत्तर देण्याबाबत आदेशीत करण्यात यावे.

श्री.देसरडा प्रशांत :सभेच्या अगोदर विभाग प्रमुखाची बैठक घेण्याची पध्दत मा.आयुक्तांची आहे की नाही माहिती नाही. जर तशी बैठक घेत असेल तर उत्तर दिले की नाही हे का निदर्शनास आले नाही. वृत्तपत्रात येणाऱ्या बातमीचा मा.आयुक्त खुलासा मागवितात असे कळते बोगस धनादेशाच्या संदर्भात वृत्तपत्रात मोठी बातमी आली असताना माहिती का घेतली नाही. याचे गांभीर्य नाही का.

मा.आयुक्त :गेल्या १०-१५ वर्षात जवळपास ९७ते९८ लक्षचे धनादेश वटवले नाही. हा मुद्दा समोर आला होता या संदर्भात एक महिण्यापूर्वी बैठक घेवून ज्यांनी बोगस धनादेश दिले त्यांचेवर १५ दिवसाच्या आत केस करण्याचे अधिकार दिले आहे. यासर्व प्रकरणात ज्या कामासाठी धनादेश दिला त्यात जास्त मालमत्ता कराचे प्रकरण असतील जर आतापर्यंत टॅक्स आलेला नसेल तर सील करावे प्रश्नाचा खुलासा त्या-त्या सदस्यांना मिळाला पाहिजे असे सर्व विभाग प्रमुखांना सुचना देण्यात येतील.

श्री.देसरडा प्रशांत :नागरीकांनी टॅक्स भरणा केला बोगस चेक दिले गेले वटवले गेले नाही या संदर्भात जे जबाबदारी अधिकारी असतील त्यांनी काय कार्यवाही केली आहे.

मा.आयुक्त ही प्रकरणे १९९५ नंतरची १०-१२ वर्षापासूनचे धनादेश आहे.१९९५ प्रकरणात संबंधीत नागरीकावर गुन्हा दाखल करता येणार नाही ज्या कामासाठी चेक दिला होता आजपण त्याचे नावे थकबाकी असेल सील लावण्याचे आदेशीत केले आहे व एक सर्क्युलर काढून चेक बॉन्स झाल्यानंतर १५ दिवसाच्या आत काय कार्यवाही करावी लागते सुचना दिल्या आहेत.

श्री.देसरडा प्रशांत :बोगस चेक दिल्यास त्यासंबधी संबंधीतावर सहा महिण्याच्या आत कार्यवाही करावी लागते हा कायदा आहे असे असतांना संबंधीत अधिकारी यांनी का कार्यवाही केली नाही.

मा.आयुक्त :१९९५ चा चेक बॉन्स झाला असेल त्यावर कार्यवाही करण्याचा अधिकार नाही परंतू ज्या कारणासाठी चेक दिला होता त्या व्यक्तीवर थकबाकी असेल तर त्यांचे मालमत्तेस सिल करण्याचे आदेशीत केले आहे. चेक बॉन्स झाल्यास काय कार्यवाही करायला पाहिजे या बाबत अधिकारी कर्मचारी यांना माहिती दिली जाईल. स.सदस्यांना प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी विभाग प्रमुखाची असते.

श्री.देसरडा प्रशांत :प्रशासनाला विषय समजला परंतू कार्यवाही केली जात नाही.

श्री.संजय सिरसाट :आताच काही वेळापूर्वी मा.आयुक्तांनी म्हटले की लेखा विभागाचे अधिकारी मुंबईला गेलेले आहे संबंधीत अधिकारी सभागृहात आलेले आहे. म्हणजे मा.आयुक्तांपासून जी माहिती लपवायची ती लपविली जाते गोलमाल उत्तर द्यायचे ते दिले जाते. ज्यांनी बोगस चेक दिले घर सोडून गेले असतील त्यांचेवर कार्यवाही करण्याचे स्वप्न बघतो कारणीभूत अधिकारी होते त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे. एक कोटीचे नुकसान झालेले आहे.

मा.आयुक्त :मुंबईला एका ऑडीटच्या प्रकरणात साक्ष देण्यासाठी काल संध्याकाळी जेव्हा झेरॉक्स काढत होते त्यावेळी संबंधीत अधिकारी यांनी हे मुंबईला जाण्यासाठीचे झेरॉक्स काढत आहेत असे नगर सचिव यांना सांगितले होते.

श्री.संजय सिरसाट :हा मुद्दा गौण आहे नगर सचिव यांनी मा.आयुक्तांना आताच येवून सांगितले मा.आयुक्तांनी सभागृहात माहिती दिली मा.आयुक्तांची पण फसवणूक होते.

मा.आयुक्त :फक्त चूक झाली असेल तर त्यास फसवणूक म्हणणे योग्य नाही. विना इन्टेशनची चुक फसवणूक होत नाही. चेक बाऊन्स संदर्भात १५ दिवस सहा महिण्याच्या आत कार्यवाही करणे आवश्यक आहे ती करणे कदाचित कर्मचाऱ्यांना माहिती नसेल चेक बॉन्स झाल्यानंतर लिगल प्रोसेस काय करावी लागते या संदर्भात कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाईल. आता चौकशीसाठी एक अधिकारी नियुक्त करून बान्स झालेल्या चेक वर का कार्यवाही करण्यात आली नाही. चौकशीच्या नंतर दिसून आले तर जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही केली जाईल.

श्री.देसरडा प्रशांत :धनादेश वटवले गेले नाही उघड आहे. चौकशीची गरज नाही. धनादेश बॉन्स झाल्यानंतर काय कार्यवाही करावी लागते हे कर्मचाऱ्यांना माहित नसेल असे गोलमोल उत्तर देणे योग्य नाही.

श्री.हिम्मतराव दाभाडे :ज्यांना कायद्याचे नियम माहित नाही अशा अधिकाऱ्यांकडे का काम दिले जाते. मा.आयुक्तांसह इतर अधिकारी योग्य खुलासा देत नाही प्रशासन अधिकारी यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करते.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सहा महिण्याच्या आत कार्यवाही करावी लागते त्यानंतर तीन वर्षापर्यंत रिकव्हरी सुट दाखल करता येतो ते ही केले नाही. महापालिकेचे एक कोटीचे नूकसान झालेले आहे चेक बॉन्स झाले फंडात रक्कम जमा झाली नाही हे सिध्द होते यास कुणीतरी जबाबदार आहे काय कार्यवाही करणार.

श्री.संजय जोशी :एखाद्या मुद्यावर अनेक वेळा सदस्य चर्चा करतात कार्यवाही होत नाही म्हणून लेखी प्रश्न विचारणा करतात. सभेच्या आगोदर सर्व खातेप्रमुखाची प्रशासनाने बैठक घेवून ठराव कसे आणले विचारणा केली का अनेक वेळा मा.आयुक्तांची दिशाभूल करून सहया घेतल्या जातात. प्रशासनाने सभेच्या अगोदर अधिकाऱ्या सोबत बैठक घेण्याचे आदेशीत करावे जेणे करून वेळेवर धावपळ होणार नाही. चेकच्या संदर्भात स्थायी समिती मध्ये चर्चा केलेली होती झोन कार्यालयात नागरीकांनी कराची रोख रक्कम भरणा केल्यानंतर महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी ती जवळ ठेवून घेतली व बंद असेलेले बँक खात्याचे धनादेश त्या सोबत लावले गेले. बोगस धनादेश लावण्याचे काम कुणी केले याची स्थायी समितीमध्ये चर्चा झाली होती मा.आयुक्त यांनी चौकशी केली जाईल असे म्हटले होते अजूनही झोन कार्यालयात येवून चौकशी केली नाही. मा.आयुक्तांनी ज्यांना आदेशीत केले होते त्यांनी का चौकशी केली नाही त्यांचेवरही कार्यवाही करावी. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हावी सदस्यांच्या प्रश्नाना उत्तर देण्याचे का टाळले जाते. यापूढे स.सदस्यांना त्यांचे प्रश्नाचे उत्तर वेळेवर देण्याचे आदेशीत करावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सभागृहातील माईक नेहमीच बंद असतात.याची दखल का घेतली जात नाही.

मा.महापौर :यापूढे सभेच्या वेळी माईक बंद असणार नाही याची संबंधीत विभागाने लक्ष द्यावे.

श्री.अ.रशिद खान :नगरपालीकेच्या काळात मुख्यालयात कराचा भरणा करून घेतला जात असे त्यावेळीही बोगस पावती बुक संदर्भात पाच कर्मचारी यांना निलंबीत केले होते महापालिका झाल्यानंतर ही काही कर्मचारी यांनी डुप्लीकेट पावती बुक तयार केले या संदर्भात तीन कर्मचारी निलंबीत केले होते ही परीस्थिती सुधारली पाहिजे. धनादेश वटवले जात नाही याचा अर्थ प्रशासनाचे याकडे लक्ष नाही. तीन ठिकाणी रजिस्टर ठेवले असते व संगणकीकरण केले असते तर हा प्रकार झाला नसता टॅक्स आकारणी कमी जास्त केली जात आहे. कर्मचारी यांना निलंबीत केले जाते पुन्हा कामावर घेतले जाते दररोज किती पावती दिल्या किती धनादेश आले किती रक्कम जमा झाली याची तपासणी करून उपआयुक्ताकडे रेकॉर्ड यायला पाहिजे तसे होत नाही प्रकरण गांभीर्याने घ्यावे .वसुली करण्याची सिस्टम सुधारण्यात यावी.

मा.महापौर : ज्या स.सदस्यांनी लेखी प्रश्न देवून माहिती विचारली आहे त्यांना त्वरीत वेळेवर उत्तर देण्याची कार्यवाही झाली पाहिजे. खुलासा स्पष्टपणे असावा सर्वसाधारण सभेच्या अगोदर मा.आयुक्त यांनी संपुर्ण विभाग प्रमुखाची बैठक सभेविषयी माहिती घेतली पाहिजे. स.सदस्यांना उत्तरे ही विभाग प्रमुखांनी द्यावे. शाखा प्रमुखांचे स्थरावर दिले जाते. विभाग प्रमुखांनी लेखी उत्तर द्यावे. अनेक धनादेश बॉन्स झाले त्या संदर्भात पुढील कार्यवाही संबंधीत अधिकारी यांनी का केलेली नाही त्या संदर्भात चौकशी करून जबाबदारी निश्चित करून संबंधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी. आठ दिवसात अहवाल महापौर म्हणून माझेकडे सादर करावा.

श्री.प्रशांत देसरडा :किती न्यायालयीन प्रकरणे प्रलंबीत आहे असा दुसरा प्रश्न दिलेला होता त्यावर विधी विभागाने असे उत्तर दिले की आपण या विभागात आल्यास त्याची यादी अवलोकनार्थ सादर होईल. अनेक प्रकरणात कोणत्या तारखेला सुनावणी असते हे विधी विभागास माहित नसते. एक महिण्यापूर्वी प्रश्न विचारलेला होता वेळ लागला तरी हरकत नाही परंतू लेखी उत्तर मला देणे गरजेचे होते. महापालिकेचे पॅनल वरील वकील हजर नसतात महापालिकेच्या मालकीची जागा असतांना विरोधी पक्षकाराच्या बाजुने निकाल लागतो. बन्सीलाल नगर येथील महापालिकेची खुली जागा महापालिकेचे वकील हजर नसल्याने ती जागा एका बिल्डरला मिळाली. करोडो रक्कमेची टॅक्स प्रकरण न्यायप्रविष्ट आहे कोणत्या प्रकरणात कोणते वकील व कोणत्या कोर्टात मॅटर चालू आहे याचा डाटाच नाही. रोटेशन नुसार केसेस न देता एकाच वकीलाकडे ७५ टक्के केसेसे दिल्या जातात किती केसेस जिंकलो व किती केसेस मध्ये विरोधकांच्या बाजूने निकाल दिला गेला ही सर्व माहिती विचारली उत्तर दिले नाही ९९ टक्के केसेस विरोधकाच्या बाजूने निकाल लागतो यास जबाबदार कोण. अनेक मोठमोठया मालमत्ता लोकांनी बळकावल्या आहेत. प्रश्न दिला मॅन पावर नाही म्हणून उत्तर दिले नाही याची कुठेतरी दखल घेतली पाहिजे. मा.महापौर यांचेच वार्डातील ओपनस्पेसच्या बाबतीत त्यांना कोर्टात प्रकरण गेल्यानंतर किती मेहनत घ्यावी लागली याची माहिती महापौरांना आहे. माझ्या प्रश्नाचा खुलासा केव्हा देणार याची माहिती घ्यावी.

श्री.संजय सिरसाट :एका जागेच्या संदर्भात सदर जागा कुणाची आहे विचारणा केली होती. त्यावर असे उत्तर मिळाले की त्याजागेशी महापालिकेचा काहीही संबंध नाही.

मा.महापौर :मा.आयुक्त यांनी खुलासा करावा.

मा.आयुक्त :न्यायालयीन प्रकरण असलेल्या केसेस किती आहे याची एका ठिकाणी माहिती नाही. त्यासाठी एक ते दीड महिण्यापूर्वी विधी विभागात संगणकीकरण करण्याचे काम सुरू केलेले असून आणखी दोन महिणे लागतील. ज्या चालू असलेल्या केसेस आहे फायनल निर्णय झालेला आहे या केसेसची सात दिवसात यादी तयार करावी व स.सदस्य तसेच मा.महापौर यांना संबधीत अधिकारी यांनी द्यावी.

मा.महापौर :कोणत्या वकीलाकडे किती व कशाच्या बाबतीत केसेस दिलेल्या आहे याची सदस्यांना माहिती देण्यास हरकत नाही प्रशासनाने या विषयाकडे गांर्भीयाने लक्ष देवून सर्व विभागातील माहिती/डाटा व्यवस्थीत संकलीत करून स.सदस्यांना माहिती मिळेल यांची दखल घ्यावी.

श्री.हिम्मतराव दाभाडे :शहरातील कोणतेही झाड तोडण्याची परवानगी महापालिकेला लागते का सौ.आशा दांडगे एन -७ यांचे घरासमोर बाबूंचे झाड होते बाजूचा पत्ता देवून बोगस सहया देवून ते झाड तोडण्याबाबत तक्रार दिली त्यानूसार महापालिकेच्या अधिकऱ्यांनी ते झाड काढून सिध्दार्थ उद्यानमध्ये आणून ठेवले. तोंडी परवानगी घेतली म्हणतात.

मा.आयुक्त :वृक्ष प्राधिकरणाची मान्यता घ्यावी लागते. या प्रकरणात मला माहिती नाही परंतू संबधीत अधिकारी दोन दिवसात माहिती घेवून खूलासा करतील.

**विषय क्र. १२९ :**

दिनांक १८.०१.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.मुजीब खान | :दि.३१-१-२००८ रोजीच्या सभेत शेवटचा विषय ९५ होता आजच्या सभेला सुरूवातीचा विषय १२९ आलेला आहे ९५ ते १२९ दरम्यानचे विषय कोणते आहेत माहिती द्यावी. |
| मा.महापौर | :नगर सचिव यांनी खुलासा करावा. |
| नगर सचिव | :३१ जानेवारी ०८ च्या सभेत स.सदस्यांचे लेखाशिर्षक बदल्याचे तसेच प्रशासकीय ऐनवेळचे प्रस्ताव मंजूर केलेले आहे व त्यास क्रमांक दिलेले आहे पुढील सभेत ते इतिवृत्तात येतील. |
| श्री.मुजीब खान | :३४ ऐनवेळचे विषय मंजूर करणे योग्य नाही कोणते विषय होते सभागृहात यायला पाहीजे होते. ही सभागृहाची पध्दत नाही. |
| श्री.कैलास गायकवाड | :३४ विषय कोणते होते याचे स्पष्टीकरण करावे. |
| मा.महापौर | :३४ विषय आपण जे म्हणता ते पुढच्या वेळेस इतिवृत्तात येतीलच यात स.सदस्यांचे लेखाशिर्षक बदलण्याचे तसेच प्रशासकीय विषय होते. |
| श्री.मुजीब खान | :जो पर्यत सदर विषय काय होते सभागृहाच्या निदर्शनास आणून देत नाही तोपर्यंत इतिवृत्तावर कामकाज चालू देणार नाही. |
| मा.महापौर | :इतिवृत्तात विषय येणारच आहे. |
| श्री.मुजीब खान | :३४ विषय कोणते घेण्यात आले समोर आणावे त्यानंतर १२९ विषय घेण्यात यावा. |
| श्री.कैलास गायकवाड | :जे ३४ विषय इतिवृत्तात ऐनवेळी घेण्यात आले ते जोपर्यत सभागृहासमोर येत नाही तोपर्यत इतिवृत्त्त कायम करू नये. |
| मा.महापौर | : ते विषय इतिवृत्तात येतीलच परंतू अनेकवेळा असे होते की ऐनवेळी स.सदस्य लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव घेवून येतात अशा वेळी काय करणार आहे. |
| मा.आयुक्त | :दि.१८.१.२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करीत आहोत ३१.१.२००८ रोजीचे इतिवृत्त कायम करण्यासाठी येईल त्यावेळी चर्चा करून निर्णय घेता येईल. |
| श्री.कचरू मोरे | :लेखशिर्षक बदलण्याचे व्यतिरिक्त दुसरे कोणते विषय त्यात आहे. विषय क्र.९५ पर्यत मान्यता द्यावी बाकी स्थगित ठेवावे. |
| श्री.अ.रशिद खान | :पुढील बैठकीत हे इतिवृत्त कायम करावे. |
| श्री.कोकाटे काशिनाथ | :तांत्रिक मुद्या स.सदस्य श्री.मुजीब खान यांनी मांडला आहे.१२९ विषयांच्या अंतर्गत सदर ३४ विषय आहे. यात लेखाशिर्षक बदलण्याचे प्रस्ताव असतील कारणा पुरता उतारे दिले असणार आहे. त्यासाठी १२९ स्थगित ठेवावे पुढील बैठकीत घेण्यात यावे. |
| मा.महापौर | : इतिवृत्त कायम करण्याचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवण्यात यावा. |

**ठराव :**

दिनांक १८.०१.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी पूढील बैठकीत ठेवावे असे ठरले.

**विषय क्र. १३० :**

**स्थायी समिती कडील प्रस्ताव**

दिनांक ५/२/२००८ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.३२५ अन्वये औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील सन २००८-२००९ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावात नमूद **क- मध्ये फंक्शन हॉलचा समावेश करावा तसेच अ.क्र.३ व्यावसायिक गटामध्ये अनुदानीत असलेल्या परंतु शासनाकडून किंवा जिल्हा परिषदेकडून इमारतीचे भाडे घेणाऱ्या संस्था/शाळा यांना देखील व्यावसायिक कर आकारणी करावी** या दुरूस्तीसह मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यास मंजुरी देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात आलेली आहे.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे.**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ नूसार प्रत्येक आर्थिक वर्षाचे मालमत्ता कर आकारणी करणे करिता त्या वर्षात निश्चीती ही २० फेब्रुवारी पुर्वी होणे आवश्यक

आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार सदर दर निश्चितीचा प्रस्ताव हा मा. स्थायी समितीने मंजुर करून मा. सर्व साधारण सभेने दि. २० फेब्रुवारी किंवा त्यापूर्वी दर निश्चीतीचे प्रस्तावास मान्यता देणे आवश्यक आहे.

मागील वर्षी म्हणजे सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात औरंगाबाद महापालिकेने मालमत्ता कर हे बांधकामाचे प्रकार अ, ब, क, ड, इ, असे वर्गीकरण करून व शिघ्रसिध्द गणक (Ready Reckner) आधारे निवासी जागांची किंमत ठरवून निश्चित करणेत आलेले आहे. त्यामुळे कोणती मिळकत शिघ्रसिध्द गणकाचे नोंदी नुसार कोणत्या किंमतीत येते हे ठरविणे सोपे झालेले आहे.

**सध्याचे प्रचलीत दर पुढील प्रमाणे आहे :-**

| वर्ग | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| अ | आर सी सी छत | ९.५०/- | ८.५०/- | ७.५०/- | ६.५०/- |
| ब | गोल पटाव लाकडी छत | ७.५०/- | ७.००/- | ६.५०/- | ५.५०/- |
| क | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोटाइलस | ६.५०/- | ६.००/- | ५.००/- | ३.५०/- |
| ड | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबूचे तटर) | ४.००/- | २.५०/- | १.२५/- | १.००/- |

**निवासेत्तर वापर असलेल्या इमारतीस खालील दर राहतील :-**

| वर्ग | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| अ | आर सी सी छत | २४/- | २२/- | २१/- | २०/- |
| ब | गोल पटाव लाकडी छत | २०/- | १८/- | १६/- | १४/- |
| क | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोटाइलस | १८/- | १६/- | १४/- | ८/- |
| ड | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबूचे तटर) | १६/- | ६/- | ३.२५/- | ३/- |

मागील वर्षाचे दर पाहता निवासी मिळकतीत ४५% ते ४८ टक्के निवासेत्तर मिळकतीस साधारणतः ७०.५% ते ७८.५% टक्के किंवा त्या पेक्षा जास्त कर आकारणेत येतो. करिता मागील वर्षाचे प्रमाणेच (त्याच दराने) पुढील वर्षात २००८-२००९ मध्ये कराचे दर ठेवणे योग्य राहील. त्यात वाढ करणे योग्य वाटत नाही.

**अ)** तसेच मागील वर्षात बांधकाम हाऊसींग ग्रुप स्कीमला बढावा देण्यासाठी सदर स्कीमला सामान्य करात २०% ( वीस टक्के) सवलत देणेत आलेली होती. अंतरीक विकास जो पर्यत विकासक स्वतःकामे करील तो पर्यंत ही सूट देय राहील. ज्यावेळी महानगरपालिका देखभाल करेल सूट देय होणार नाही. वरील ग्रुप हाऊसींग **२०% ऐवजी ५०%** टक्के सवलत सामान्य करात देणे बाबत. त्या अनुषंगाने वरील प्रमाणे सुधारीत दर प्रस्तावीत करण्यात येत आहेत.

**ब)** महापालिका औरंगाबाद मध्ये सध्या निवासी, निवासेत्तर असे दोन प्रकार आहेत, त्यात बदल करून नाशीक महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रमाणे निवासी, निवासेत्तर व्यवसायीक व औदयोगीक असे चार भाग करणेत यावे.

तसेच औरंगाबाद महानगरपालिकेने राज्यातील इतर महापालिके प्रमाणे मागील वर्षातील थकीत मालमत्ता कर पाणीपट्टी कर व इतर करांवर विंलब शुल्क ( Delay Payment Charges) आकारणेत यावे जेणे करून मालमत्ता कर पाणीपट्टी कर व इतर कर थकीत राहणार नाही. तसेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर थकीत करांचे रक्कमेवर १२% टक्के विंलब शुल्क (Delay Payment Charges) आकारणेत यावे.

**क)** तसेच शहरातील मंगल कार्यालय, हॉटेल, लॉन्स, पेट्रोलपंप चा वापर व्यवसायीक होत असल्याने खुल्याजागासह व्यवसायीक दराने कर आकरणी करावी

**ड)** मोबाईल टॉवर्स :- करारनामा प्रमाणे किंवा टॉवरचे उंची नुसार जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारणी चा प्रस्ताव आहे.

**मालमत्ता कर आकारणी करणे करिता सन २००७-२००८ प्रचलीत दर खालील प्रमाणे आहेतः**

| अ.क्र. | करांचे नाव | कर योग्य मुल्य | प्रचलीत दर सन | प्रस्तावीत दर सन २००८ पासून |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १) निवासी वापराचे सर्व कर योग्य मुल्यावर | ३० % | ३० % |
| | | २) निवोसेत्तर वापराचे सर्व करयोग्य मुल्यावर | ४५ % | ४५ % |
| २ | साफसफाई कर | १) निवासी करयोग्य मुल्यावर. | ३ % | ३ % |
| | | २) निवासेत्तर करयोग्य मुल्यावर. | १० % | १० % |
| ३ | वृक्ष कर | कोणतेही करयोग्य मुल्यांवर | १ % | १ % |
| ४ | अग्नीशमनकर | | १.५ % | १.५ % |
| ५ | म.न.पा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |

मोकळया जागेवरील कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल तसेच राज्य शिक्षण कर रोजगार हामी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णया प्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येतील.

सन २००८-२००९ या आर्थिक वर्षापासून कर आकारणी करताना कर निश्चित करणे तसेच कर आकारणीचे निवासी निवासेत्तर ऐवजी नव्याने दोन गट सामाविष्ट करणे आवश्यक आहे.

**१. निवासी :-** राहते घर

**२. निवासेत्तर :-** धर्मदाय संस्था अनुदानीत शैक्षणीक संस्था, शाळा, वस्तीगृहे महाविदयालये, स्वंयसेवी संस्था, सेवाभावी संस्था, वकीलांचे कार्यालय, डॉक्टराचे क्लीनीक, कर सल्लागार , तत्सम.

**३. व्यवसायीक :-** पेट्रोलपंप, हॉटेल्स, लान्स मोकळया जागा व्यवसायीक वापर होत असल्यास,मॉल्स सर्वप्रकारचीदुकाने,कोचींग क्लासेस.
हॉस्पीटल्स, विना अनुदानीत (देणगी घेणारी) शाळा, कॉलेज.
तत्सम

**४. औद्योगीक :-** एम.आय.डी.सी. क्षेत्र

वरील नुसार सामान्य कराचा दर करयोग्य मुल्यावर सुधारीत करणे सुध्दा आवश्यक आहे.

| **सामान्य कर** | **सध्याचे दर** | **प्रस्तावीत दर** |
|---|---|---|
| १. **निवासी** | ३०% | ३०% |
| २. **निवासेत्तर** | ४५% | **३७.५०%** |
| ३. **व्यवसायीक** | ४५% | ४५% |
| ४. **औद्योगीक** | सध्याचे दराने | सध्याचे दराने |

सध्याचे दराप्रमाणे एम.आय.डी.सी. चिकलठाणा क्षेत्रात उदयोग बंद किंवा औद्योगीक उदयोग असल्याने सध्याचे दर ठेवणे योग्य.

**तसेच मालमत्ता नामांतर शुल्क (खरेदी / विक्री) किंमतीवर किंवा Ready Reckner** दरावर (यामध्ये जे अधीक असेल ते) **१% घेणेत यावे.**

**सध्याचे नामांतर फी चे दर वारसा व वाटणीपत्र पध्दतीस लागू राहतील.**

राज्यातील काही मनपा विलंब शुल्क **(Delay Payment charges)** आकारतात काही मनपा कराचा भरणा होणे करीता सामान्य करात सूट देतात. **Penalty & Reward** या तत्वावर विलंब

शुल्क वसूल करणे व वेळेवर भरणा करणाऱ्या करदात्याना सूट (**Net ,** बॅंक अकाँट ट्रान्सफर खात्या द्वारे भरणा) देणे बाबत विचार करण्यास हरकत नाही.

| **कर भरण्याचा महिना** | **सामान्य करात सूट** |
|---|---|
| एप्रिल | ५ % |
| मे | ४ % |
| जुन | ३ % |
| जुलै | २ % |
| ऑगष्ट | १ % |
| सप्टेंबर | ० % |

तसेच पुढील सहा महिन्या करीता थकबाकीवर विलंब शुल्क आकारले जाईल :-

| **महिना** | **एकुण देय करावर विलंब शुल्क** |
|---|---|
| ऑक्टोबर | १ % |
| नोव्हंबर | २ % |
| डिसेंबर | ३ % |
| जानेवारी | ४ % |
| फेब्रुवारी | ५ % |
| मार्च | ६ % |

सदर आर्थिक वर्षात कराचा भरणा करणेस टाळाटाळा करणाऱ्या मालमत्ता व नळधारकांवर आर्थिक वर्षाचे थकीत करांचे रक्कमेवर १२% विलंब शुल्क **(Delay Payment charges)** आकारणी केल्यास व करांची वसूली सहामाही कर आकारणी प्रमाणे वसूल केल्यास विकास कामाना निधी उपलब्ध होवू शकेल व न्यायालयीन विवाद कमी होतील.

वरील प्रमाणे करातील दराचे बदलासह प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.काशिनाथ कोकाटे :स्थायी समितीने काही शिफारशी करून प्रशासनाचा मुळ प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. यात तीन चार बाबी संदर्भात तृटी आहे. यात असे म्हटले की क- मध्ये फंक्शन हॉलचा समावेश करावा तसेच अ.क्र. ३ मध्ये व्यावसायिक गटामध्ये अनुदानीत असलेल्या परंतु शासनाकडून किंवा जिल्हा परिषदेकडून इमारतीचे भाडे घेणाऱ्या संस्था/शाळा यांना देखील व्यावसायिक कर आकारणी करावी. या दुरूस्तीसह कराचे दर निश्चित करण्यास मंजूरी देवून या सभागृहासमोर शिफारस केली आहे. यात फंक्शन हॉलची व्याख्या काय? महापालिका हद्दीमध्ये ज्या मालमत्ता आहेत किरायाने दिलेल्या आहे व मालक यात तफावत ठेवलेली होती काही किरायदार दाखवायचे काही नाही त्यात काही तृटी होत्या म्हणून घेवू नये व महापालिकेचा पार दर्शक कारभार करण्याच्या दृष्टीने गेल्या स्थायी समिती मध्ये यामध्ये घर मालक व किरायदार हा विषय त्यावेळेस सर्वसाधारण सभेमध्ये बाजूला केला आज पून्हा अनुदानाति विना अनुदानिक जे काही नमुद केले या विषयी स्पष्ट भुमिका घ्यावी लागणार आहे. शैक्षणिक,सामाजिक धोरण जे काही रूग्णालय आहे त्यांचे बाबतीतले धोरण कशामध्ये घेणार आहोत. एखादया संस्थेला सुरूवातीला चार वर्षानंतर काहीना पाच तर काहीना सात वर्षा नंतर अनुदान मिळते तोपर्यत त्याचे बाबतीत काय धोरण आखणार आहोत. आठ वर्षाची एनआरव्ही लावलेली असेल व सात वर्षानंतर ग्रॅन्ट मिळाले तर कमी करावे लागेल.

मा.आयुक्त :पूर्वी निवास व निवासेत्तर असे दोन रेट होते. निवासेत्तर मध्ये सर्वांना तेथे शाळा असेल वाणिज्य म्हणून असेल किंवा प्रोफेशनल म्हणून डॉक्टर इंजिनियर किंवा लॉयर्स त्याचे ऑफीसेस असतील सर्वांना एकच व्यावसायिक कराचे ४५ रू.रेट लावले जात होते. काही ॲडव्होकेट आले होते त्यांनी म्हटले की आमचे कार्यालय कर्मशियल ॲक्टिव्हिटीज नाही तर त्यास

कमर्शिलय रेट लावू नये. त्यामूळे निवासी व कर्मशियल असे दोन रेट होते ते तोडून एक निवास, निवासेत्तर व कमर्शियल असे वेगळे केले निवासेत्तर मध्ये जे प्रोफेशनल असतात ॲडव्होकेट त्याचे कार्यालय त्यास ३७ टक्के रेट लावण्यात यावा याचा एनआरव्हीशी संबंध नसून रेट ऑफ टॅक्सेशनशी संबंधी आहे. जेव्हा स्थायी समिती समोर ठेवले की नवीन टॅक्सेशन जो की प्रोफेशनल ३७ टक्के त्यावेळी चर्चा होवून ज्या शाळा यांना शासनाचे ग्रॅन्ट मिळते तसेच रेंट मिळते त्यांना सुध्दा कमर्शियल टॅक्स लावावा. अशी दुरूस्ती स्थायी समितीने केली आहे.

श्री.संजय जोशी ज्या संस्थेला ग्रॅन्ट मिळते व जागा भाडेनी घेतलेली आहे ती संस्था शासनाकडून किंवा जिल्हा परिषदेकडून भाडे घेते अशांना व्यावसायीक कर लावावा हा विषय स्थायी समितीत झालेला होता.

श्री.काशिनाथ कोकाटे :यापूर्वी दोन भागामध्ये टॅक्सेसचे दर आकारणी होत होती. तिसऱ्या भागाची निर्मिती केली. जर एखाद्या संस्थेला नंतर ग्रॅन्ट मिळाले कोणता दराने टॅक्स लावणार पत्र्याची बांधलेली असेल त्याची एनआरव्ही काय लावणार.

मा.आयुक्त : जी एनआरव्ही असेल,जर सिमेन्ट पत्र्याचे असेल तर भाग ड मध्ये येईल नवीन इमारत आहे त्यास टॅक्सचे रिटेल व्हॅल्यू लागेल स्थायी समितीच्या दुरूस्तीनंतर ४५ टक्केने टॅक्सेशनचा रेट लागेल शेवटच्या पेजेसवर तक्ता दिला त्यानुसार एनआरव्ही कॅल्क्युलेट केली जाते.

श्री.काशिनाथ कोकाटे :फन्कशन हॉल म्हणजे काय त्यात कोणत्या सोयी सुविधा असतात. व्यावसायिक वापरासाठी परवानगी दिल्यास पार्कींगसाठी जागा ठेवली नसेल तर त्यासाठी काय करणार आहे. फंकशन हॉल ची परिभाषा काय?

मा.आयुक्त :जे काही क्षेत्र एफएसआय मध्ये येते त्यास कमर्शियल लागेल शॉपींग कॉम्प्लेक्स मध्ये पार्कींच्या जागेवर गैरवापर करीत असेल तर ते थांबविणे किंवा ते तोंडणे गरजेचे आहे. जेवढे क्षेत्र शॉपींग सोयी सुविधासाठी एफएसआय प्रमाणे त्या क्षेत्रास तेवढी एनआरव्ही लागेल. अनधिकृत बांधकामाचा टॅक्स टेक्नीकली घेवू शकतो.

श्री.संजय जोशी :अनधिकृत असल्यामूळे टॅक्स घेता येणार नाही. त्यास पाडावेच लागेल.

मा.आयुक्त :ठिक आहे असे बांधकाम झालेले असेल तर मांडण्याची कार्यवाही होईल मंगल कार्यालय तसेच फंकशन हॉलची परीभाषा बंद करायला पाहिजे.

श्री.देसरडा प्रशांत :शासन किंवा महापालिकेच्या नियमावलीमध्ये मंगल कार्यालय की फंकशन हॉल म्हणून उल्लेख आहे का?

श्री.संजय जोशी :या प्रश्नाचा खुलासा करण्यासाठी अधिकारीच नाही महापालिकेला सहाय्यक संचालक नगररचना या पदावर अधिकारी नाही एक वर्षापासून मागणी करीत आहे अद्याप अधिकारी आलेले नाही. डीसी रूलचे पुस्तक मागवावे त्यात फंकशन हॉल असा उल्लेख आहे का?

श्री.काशिनाथ कोकाटे :हा प्रशासकीय प्रस्ताव असल्यामूळे यासंबंधी सर्व कायदेशीर बाबी प्रशासनाने तपासल्या असतीलच फंकश हॉलची व्याख्या,परीभाषा काय सोयी सुविधा काय दिल्या जातात. डिसी रूलमध्ये अटी व शर्ती तसेच क्षेत्रफळ किती पाहिजे. सर्व खुलासा करावा त्यानंतर निर्णय घ्यावा.

श्री.देसरडा प्रशांत : क मध्ये फंकशन हॉलचा समावेश करावा असे दिले डीसी रूलमध्ये कुठे दिलेले आहे खुलासा द्यावा.

मा.आयुक्त :आपल्या विकास कार्य नियमावलीत नियम क्र.२-५-४ मध्ये असेंबली बिल्डींगची तरतूद आहे. ते सर्व यात समाविष्ट करावे.

श्री.देसरडा प्रशांत :फंकशन हॉल नियमाने लिहिता येत नाही.

मा.आयुक्त :स्थायी समितीचा जो बेसीक मुद्दा होता की कोणताही हॉल कोणत्याही कारणामूळे सुटू नये यात २.५.४ मध्ये ॲसेब्ली इमारत लिहिलेले आहे ते सर्व क मध्ये समावेश करावे अशी दुरूस्ती करावी.

श्री.देसरडा प्रशांत :किती मंगल कार्यालय आहे. यामूळे किती करात वाढ होणार आहे.

मा.आयुक्त :किती इमारतीला मंगल कार्यालय म्हणून परवानगी दिली याची माहिती सध्या उपलब्ध नाही परंतू अग्निशमन विभागाने मंगलकार्यालयाकडे विचारणा केली होती किती यात किती ॲक्टीव्हिटीज होतात. टेक्नीकली त्यांनी कशासाठी परवानगी घेतलेली होती तपासणी करावी. जेथे मंगलकार्य केले जाते अशी एकूण ७२ नोंद केलेली आहे. यापैकी किती लोकांनी मंगल कार्यालय म्हणून परवानगी घेतली तपासणी करावी लागेल.

श्री.मुजीब खान :मंगलकार्यालयासाठी किती इंचचे नळ कनेक्शन आहे. माझ्या माहिती प्रमाणे एक इंचपेक्षा मोठे कनेक्शन आहे या संदर्भात स्थायी समितीमध्ये अनेक वेळा मुद्दा मांडला आजपर्यंत कार्यवाही नाही आजही निवासी वापरासाठीची पाणीपट्टी भरणा करतात.

मा.आयुक्त :पुढील बैठकीत पाणीपुरवठा अधिकारी यांनी कोणत्या मंगल कार्यालयासाठी किती इंचचे नळ कनेक्शन आहे. वसूली कोणती केली जाते व थकबाकी किती व कुणाकडे आहे याची माहिती द्यावी.

श्री.अ.रशिद खान :मंगलकार्यालयासाठी पार्कींग नाही. रस्त्यावर वाहने उभी राहतात पार्कींगची फिस वसूलीसाठी टेंडर काढावे महापालिकेचा फायदा होईल.

मा.आयुक्त :जेथे पार्कींग होते त्या रस्त्यावर फिस वसूली ऐवजी हे जास्त महत्वाचे आहे की पे ॲन्ड पार्क करावयास पाहिजे. पार्कींग चांगल्या पध्दतीने होईल. जर महापालिका धोरण मान्य करीत असेल तर रस्त्याच्या नाव व रेट सह प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवला जाईल.

डॉ.भागवत कराड :अशी माहिती आहे की एक ही मंगल कार्यालय म्हणून परवानगी नाही फंकशन हॉल या नावाखाली परवानगी आहे. पार्कींगची व्यवस्था नाही टॅक्स हा कमी लागलेला आहे. ७२ ठिकाणी जे लग्न कार्यालय होतात किंवा इतर कार्यक्रम होतात तो बदल करून कमर्शिलय ॲक्टीव्हिटीज दाखविल्या तर महापालिकेचे उत्पन्न वाढेल. त्या दृष्टीने कार्यवाही करण्याची गरज आहे. अशा ठिकाणी पेॲन्ड पार्क व्यवस्था करावी महापालिकेचे उत्पन्न वाढवावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :सिडकोचे हस्तांतरण करते वेळी याभागातील सर्व मालमत्ताचा ड वर्गामध्ये समावेश करण्यात यावा अशी चर्चा झालेली होती. या मालमत्तासाठी ६.५० रू.स्क्वे.मी.ऐवजी ५रू स्क्वे.मी. दर आकारणी करावी एकदमच ४० हजार मालमत्ता महापालिकेकडे हस्तांतरीत झाल्या सुरूवातीलाच त्याजनतेवर अधिभार लागू नये या संदर्भात त्यावेळी सभागृहात चर्चा झलेली होती. जास्त लावण्यात आलेला कर कमी करण्यात यावा.

श्री.संजय सिरसाट :फंकशन हॉलला परवानगी कशाच्या आधारे दिली जाते.

श्री.अ.रशिद खान :सिडको हडकोसाठी ५ रू. प्रमाणे व शहरासाठी ६.५० रू. प्रमाणे आकारणी केल्यास कुणी मा.न्यायालयात दाद मागेल त्यामूळे महापालिका अडचणीत येईल सरसकट ५ रू करण्यात यावे.

श्रीमती जयश्री किवळेकर : सिडको हस्तांतरण होवून दोन वर्षे होत आहे, तरी हा जो मालमत्ता कर लावण्यात आला तो चूकीचा लावण्यात आलेला असून रू.५ स्क्वे.मि. प्रमाणे लावण्यात यावा म्हणून यापूर्वी या सभागृहाने निर्णय घेतलेला होता. असे असतांना सिडको नागरीकांना रू.६.५० स्क्वे.मी. प्रमाणे कर आकारण्यात आलेला आहे ५ रू. प्रमाणे लावण्यात यावा.

श्री.देसरडा प्रशांत :जो तक्ता प्रस्तावात प्रशासनाने ठेवला व जो ठराव दोन महिण्यापूर्वी सर्वसाधारण सभेने मान्य केला त्यानूसार दिशाभूल करणारा तक्ता ठेवला आहे. सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला ठराव नुसार अमलबजावणी न करणारा तक्ता आहे. सिडकोसाठी ५ रू प्रमाणे कर आकारण्यात यावा या तक्क्त्यामध्ये का नमूद केले नाही.

डॉ.भागवत कराड :जेंव्हा सिडको हस्तांतरण झाले तेंव्हा पासून जुन्या दराने टॅक्स लावण्यात यावा ही हस्तातरणामधील अट आहे त्यावेळी या राज्याचे मा.राज्यमंत्री नामदार श्री.राजेश टोपे साहेब आणि सर्व पदाधिकारी आणि महापौर या सर्वांनी मिळून घेतलेला निर्णय आहे मी महापौर असतांना सुध्दा कमी दराने

किंवा जुन्या दराने सिडकोला टॅक्स आकारावा म्हणून ठरलेले आहे या तक्त्यामध्ये सिडकोसाठी ५ रू. स्क्वे. मीटर प्रमाणे ठेवावे असे कूठे ही आलेले नाही.कुठल्याही परीस्थितीत सिडकोसाठी ५ रू. स्क्वे. मीटर प्रमाणे टॅक्स आकारला पाहिजे तो दिलेला शब्द आहे तशा सुचना आपण दयाव्यात.

श्री.संजय सिरसाट :आपण रूलींग दिली तरी प्रशासन मान्य करेल का खुलासा घ्यावा.

मा. महापौर :विषय क्र. १३० मंजूर करण्यात येतो. सिडकोतील जनतेला ५ रू. स्क्वे.मी. प्रमाणे टॅक्स आकारू म्हणून सांगितलेले होते. त्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांवरील सन २००८-२००९ या वित्तीय वर्षासाठी प्रस्तावात नमूद क- मध्ये फंक्शन हॉलचा समावेश करावा तसेच अ.क्र.३ व्यावसायिक गटामध्ये अनुदानीत असलेल्या परंतु शासनाकडून किंवा जिल्हा परिषदेकडून इमारतीचे भाडे घेणाऱ्या संस्था/शाळा यांना देखील व्यावसायिक कर आकारणी करावी या दुरूस्तीसह मालमत्ता कराचे दर निश्चित करण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच सिडकोतील जनतेला रू.५ चौ.मी. प्रमाणे मालमत्ता कराची आकारणी करणेसही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिध्दार्थ गार्डन समोरील अस्तीत्वात असलेल्या अरूंद पुलाचे रूंदीकरण करणे. या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची २००६-०७ नुसार रक्कम रू.२८,२५,०००/- चे तयार करण्यात आलेले असून सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प २००७-०८ मधील नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत उपलब्ध असलेल्या रक्कम रू.२०.०० लक्षच्या तरतुदीतून व उर्वरित वाढीव रक्कम रू.८.२५ लक्ष सन २००८-०९ च्या सुधारीत अर्थसंकल्पात समाविष्ट करून खर्च करण्यात येणार आहे.

तरी सिध्दार्थ गार्डन समोरील अस्तीत्वात असलेल्या अरूंद पुलाचे रूंदीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२८,२५,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ गार्डन समोरील अस्तीत्वात असलेल्या अरूंद पुलाचे रूंदीकरण करणेच्या कामाचे रक्कम रू.२८,२५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेटजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व उद्यान विकसीत करणे या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००६-२००७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.९९,९५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च २००७-०८ या आर्थिक वर्षात पुतळे खरेदी व दुरूस्ती या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदरील कामात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातर्फे महानगरपालिकेस उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या एक एक्कर जागेत पुतळा उभारुन उद्यान विकसीत करणे याचा समावेश आहे.

तरी रक्कम रू.९९,९५,०००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.संतोष जेजूरकर :या ठरावास विरोध नाही परंतू सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.अब्दुल साजेद :\
श्री.मिंलींद दाभाडे : } हा ठराव मंजूर करण्यात यावा.

सौ.लता दलाल : कुठल्या आयटमसला किती खर्च प्रस्तावित आहे. याची माहिती द्यावी.

श्री.संजय जगताप :ठराव आणला मी सर्वांचे स्वागत करतो परंतू विद्यापीठ समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा पूतळा स्थलांतर न करता नवीन ठिकाणी हा पुतळा बसविण्यात यावा.

श्री.मिलींद दाभाडे :स.सदस्य यांनी ठराव वाचलेला दिसत नाही पुतळा स्थलांतराचा कुठलाही उल्लेख नाही त्वरीत मंजुर करावा.

श्री.संजय जगताप :विद्यापीठ पुतळया जवळच शहीद वाघमारे यांचा स्तंभ आहे विद्यापीठाकडून जमिन घेतली मागच्या सभेत ठरले. आपण खर्च करतो. विद्यापीठ गेट समोरील सध्या अस्तित्वात असलेला पुतळा स्थलांतर न करता दुसऱ्या ठिकाणी या ठरावानुसार आणखी एक पुतळा बसविण्यात यावा या ठरावास माझा विरोध नाही या शहरातील स्थानिक मा.आमदार मा.महापौर व इतर प्रतिष्ठित नागरीकांचा विचार घेवून कार्यवाही करावी. प्रस्तावास माझा विरोध नाही.

श्री.मिलींद दाभाडे :पुतळा स्थलांतराचा यात विषय नाही. जे अंदाजपत्रक सादर झालेले आहे त्यास मान्यता द्यावी.

श्री.कचरू मोरे :डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव केवळ पुतळा असेल तरच असते असे नाही. यात जे जे आहे त्यास मंजुरी द्यावी. ठरावानुसार मान्यता द्यावी. दोन पुतळे उभारल्यास कोणत्या पुतळयाकडे अभिवादनासाठी जावे असा प्रश्न जाणाऱ्या नागरीकांना पडेल यावेळी सभागृहात अनेक सदस्य बोलत असतात.

श्री.संजय जगताप :अशा प्रकारे ठराव मंजूर झाल्यास अनेक प्रश्न निर्माण होतील. अनेकदा संघर्ष करून अस्तित्वात असलेला पुतळा उभारलेला आहे.

श्री.संजय जोशी :या विषयावर ठराविक सदस्यांनीच बोलावे का? इतरांनाही चर्चा करू द्यावी.

श्री.अ.साजेद : अंदाज पत्रकासाठी आहे मंजुर करावा.

श्री.प्रशांत देसरडा :पिपल्स एज्यूकेशन सोसायटीकडून जागेची मागणी केली त्यांनी दिली नाही त्यानंतर पूर्णाकृती पुतळा व उद्यान विकसित करणेसाठी विद्यापीठ कडून जागा घेतली त्यावेळी प्रशासन व सभागृहाची भुमिका काय होती. हे काम करण्यासाठी निधी कोठून खर्च करणार सर्व खुलासा करावा.

श्री.संजय सिरसाट :जेव्हा पुतळा उभारण्याचा ठराव झाला त्यावेळी डॉ.कराड भागवत हे महापौर होते. मी सभागृहनेता होतो. विदयापीठाचा नामविस्तार झाला त्यानंतर विद्यापीठ गेट समोर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा त्या ठिकाणी भव्य पुतळा असावा म्हणून स.सदस्य व अनेक नागरीकांची मागणी सुरू झाली. कुणी चांगले काम करीत असेल तर सत्ता कुणाची जरी असली तरी डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या नावाला कुणाचा विरोध असणेचे कारण नाही म्हणून मी सुचक म्हणून ठरावावर सही केली होती. अनुमोदक स.सदस्य श्री.तांबे होते. अनेकांनी १७ ते १८ वर्ष संघर्ष करून काही लोक हुतात्मे झाले अंदोलन केले विद्यापीठाच्या राजकारणामुळे राष्ट्रीय राजकारणात गेले. म्हणजे काहीचा फायदा सुध्दा झाला. ज्यांनी १८ वर्ष संघर्ष केला त्यांना फळ दिले पाहिजे या ठिकाणी पुतळा असावा म्हणून निर्णय घेतला होता व त्या प्रस्तावात असे दिले होते की दलीत कुटूंबातील पहिला व्यक्ती परदेशी शिक्षण घेण्यासाठी विमानाने जात आहे विमानात चढतांनाचे चित्र मागच्या साईडला करून त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर दाखवायचे असा पुर्ण देखावा विद्यापीठाच्या बाजूला निर्माण करायचा होता. असा तो प्रस्ताव होता त्यास मान्यता दिली. परंतू ज्या ६०० एकर जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मिलींद कॉलेज आंबेडकर कॉलेज विद्यापीठ स्थापन केले त्या संस्थेचे लोक डॉ.बाबासाहेबांच्या पुतळयासाठी जागा देणार नाही असा स्वप्नातही विचार केला नाही. पिपल्स एज्युकेशन सोसायटीने लेखी पत्र देवून कळविले केली पुतळयासाठी जागा देणार नाही. हे सर्व होत असतांना नामविस्तांराच्या दिनी अनेक नागरीक अभिवादनासाठी येतील म्हणून संधी साधून विद्यापीठ समोर एक पुतळा काही नागरीकांनी बसविला विद्यापीठ पिपल्स एज्युकेशन सोसायटीकडून जागा मिळेना तरी ही काही जरी झाले तरी या महापालिकेने नाव असले पाहिजे महापालिका दलित विरोधी नाही डॉ.बाबासाहेबांचे नाव जपणारी व ठेवणारी आहे म्हणून मोठा भव्य पूतळा केला पाहिजे ही भावना

होती म्हणून पुतळा आणला या ठिकाणी मा.मुख्यमंत्री तसेच इतर सर्व पक्षाचे नेते मंडळी यांना बोलवून हा पूतळा सर्व समाजाच्या सहकार्याने बसविला आहे असे चित्र निर्माण करायचे होते. परंतू काही नेत्यांना असे वाटले की एवढा मोठा कार्यक्रम घेतल्यानंतर आपल्याला क्रिडीट मिळणार नाही म्हणून काही नागरीकांच्या सहकार्याने रातोरात बाजूला उद्घाटनासाठी ठेवलेला पुतळयाचे बाहेरील कापड फाडून त्या जागेवर पुतळा बसविला त्यानंतर त्या ठिकाणी अंधार होता महापालिकेची बदनामी होवू नये म्हणून त्या ठिकाणी हायमस्ट लावण्यात आला एक कोटीची तरतूद केली आहे त्या ठिकाणी एक बेट तयार होईल. म्हणून पीएस सोसायटीकडून वाटाघाटी करून त्यांना रक्कम देवून जागा घेण्याचा कार्यवाही चालू आहे. तेथे चांगल्या प्रकारे सुशोभिकरण करणार आहोत आजही काही नागरीक नामविस्तांराच्या दिनी येवून गेटला अभिवादन करतात त्यावेळी असे वाटते की या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे चांगले चित्र असले पाहिजे. लोकांच्या भावना आहे त्यासाठी सुध्दा वाद होतो एक कोटी ठेवलेले आहे आजही पुतळा रस्त्याच्या मध्ये आहे दोन्ही बाजूने वाहने जातात ज्यांनी लिहिलेल्या घटनेमूळे जे काही आपणा सर्वांना शिक्षण घेता आले सर्व काही करता येते. अशा त्या महापुरूषाचा पुतळा हा किमान चांगल्या ठिकाणी तरी ठेवावा असे माझे मत आहे. कुणी वेगळे समजू नये नागरीकासाठी विकासाचे काम नाही एक महापुरूषाचे काम आहे कुठे तरतूद असेल तर मी सुचना मांडेल असा म्हणणारा नगरसेवक पाहिजे. अशा प्रस्तावाला कुणाचा विरोध असू नये या ठरावास मंजूरी द्यावी. कोटीची तरतूद पुतळयासाठी ठेवलेली आहे.

श्री.पुरूषोत्तम ठाकुर : मंजुर करावा.

श्री.संजय जगताप :या ठरावास विरोध नाही परंतू दुसरा पुतळा करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : विद्यापीठ गेटच्या आत बाहेर असे दोन पुतळे उभारल्यास नामांतर दिनी काही लोक एक पुतळयाकडे तर काही लोक दुसऱ्या पुतळयाकडे जावून अभिवादन करतील हे चित्र कसे दिसेल यावर काय तोडगा प्रशासनाने काढलेला आहे.

श्री.मिलींद दाभाडे :अस्तित्वात असलेला पुतळा निकृष्ट दर्जाचा आहे तत्कालीन महापौर डॉ.भागवत कराड तसेच इतर मान्यवर सदस्यांनी त्यावेळी पाहणी केली होती त्यामूळेच त्या जागेवर चांगला पुतळा करण्यासाठी १ कोटीची तरतूद सर्वसाधारण सभेने मान्य केलेली आहे.

डॉ.भागवत कराड :सन २००० साली मी महापौर असतांना विद्यापीठ गेट समोर हा पुतळा बसविण्याचा निर्णय घेतला त्यानुसार स.सदस्यांच्या नागरीकांच्या भावना लक्षात घेवून त्या ठिकाणी पुतळा उभारणीचे काम केलेले आहे. जेव्हा दुसऱ्यांदा मी महापौर झाल्यावर स.सदस्य श्री.मिलींद दाभाडे यांनी सदर पुतळा हा निकृष्ट दर्जाचा असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर त्याच ठिकाणी दुसरा उत्कृष्ट पुतळा बसविण्यासाठी एक कोटीची तरतूद दीड वर्षापूर्वी केली होती. सर्व पदाधिकारी व मा.आयुक्त आपण सर्वांनी जावून विद्यापीठ प्रशासनाकडे यासाठी चार एकर जागेची मागणी केली होती. माझ्या माहिती प्रमाणे दोन एकर जागा विद्यापीठाने महापालिकेच्या ताब्यात दिलेली आहे. या जागेत भव्य स्मारक,पुतळा,त्यामागे चांगले म्यूरल,हे व्यवस्थीत करण्याचा प्रस्ताव आलेला आहे. हा विषय मंजूर करण्याची गरज आहे पुतळा काढायचा की नाही हा विषय आज चर्चेचा नाही. कोणतेही राजकारण न होता या अंदाजपत्रकास मंजूरी द्यावी.

श्री.संजय जगताप :पुतळा न हटवता हा ठराव मंजूर करावा.

श्री.सलीम खान :प्रस्तावास मान्यता द्यावी.

डॉ.भागवत कराड :सदर पुतळा उत्कृष्ट दर्जाचा नाही असे काही सदस्यांचे म्हणणे होते त्यावेळी तेथे जावून पाहणी केली होती. त्यावेळी सदर पुतळा हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र येथे ठेवावा व त्या जागेवर या

ठरावानूसार नवीन पुतळा करावा असे ठरले होते. त्यानुसार नवीन पुतळा बसविण्याची गरज आहे.

मा.महापौर :डॉ.बाबासाहेब आंबेडकराचा त्या ठिकाणी पुतळा उभारावा अशी संपूर्ण सभागृहाची भावना आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो या प्रस्तावानुसार कशा प्रकारे पुतळा बसवण्याबाबत कार्यवाही करणार आहोत याची संपुर्ण माहीती प्रशासनाने पुढील सभेत सभागृहासमोर ठेवावी.

श्री.संजय जोशी :पुतळा उभारतांना तेथे आणखी काय विकसित करणार आहात याचे रेखा चित्र सभागृहासमोर ठेवावे.

श्री.अ.रशीद खान : निझाम सरकारने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना त्यावेळी १ रू.मध्ये सोसायटीची जागा दिली होती. त्यांचेवर सर्वजण प्रेम करतात ते सर्व समाजाचे आहे. मलीक अंबर पिण्यासाठी पाणी देत आहे. त्यांचे बाबतीत कुणी विचार करीत नाही अनेक बेरोजगार आहे त्यांचेसाठी महापालिकेने विचार करावा, महापुरूषांचा विचार करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दशविल्याप्रमाणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेटजवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे व उद्यान विकसीत करणे या कामाचे रक्कम रू.९९,९५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १३३ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा तर्फे प्रकाशित करावयाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन (गौरव) ग्रंथाच्या संपादक मंडळातील डॉ.गंगाधर पानतावणे यांना सेपादक म्हणून मानधन रू.१५,०००/- देण्यात यावे. सन २००२-०३ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन ग्रंथाच्या फक्त ५०० प्रतींची छपाई करण्याचे ठरले होते. त्यावेळी सुमारे २०० पृष्ठांचा ग्रंथ होईल असे अपेक्षित होते. निविदा मागवून निश्चित करण्यात आले त्यावर्षीचे दर प्रति ग्रंथ रूपये १९५/- असे प्राप्त झाले होते. आता पृष्ठसंख्या सुमारे ३६५ झाली आहे. हया ग्रंथाची विक्री होण्याची शक्यता लक्षात घेऊन १५०० प्रतींची छपाई करण्यात आली आहे. छपाई साठी सन २००२-०३ मध्ये ग्रंथ छपाईचे दर मंजूर करण्यात आले होते. लिबर्टी प्रिंटींग प्रेस औरंगाबाद यांचेकडून छपाई होत आहे. कारण ग्रंथात समाविष्ट करावयाचे लेखांवर चार वेळा डिटी.पी. करून संपादकीय संस्कार करण्यात आले आहेत. ग्रंथ छपाईसाठी दोन लक्ष रूपयांची तरतुद आहे. ती पाच लक्ष करण्यात यावी. ग्रंथात ज्यांच्या लेखांचा समावेश करण्यात आला आहे. अशा लेखकांना प्रत्येकी सन्मान चिन्हासह यापूर्वी मंजूर झालेले रू.७५०/- ऐवजी प्रत्येकी रू.१०००/- देण्यात यावे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राच्या सर्वोच्च अशा सल्लागार समितीने मंजुरी दिल्या नुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय ग्रंथ पुरस्कार दि.२६ जानेवारी २००७ रोजी प्रदान करण्यात आले. सदरील पुरस्कार योजना दरवर्षी आयोजित करण्यात यावी. या पुरस्कार योजने व्यतिरीक्त सुभेदार रामजी आंबेडकर, रमाबाई आंबेडकर, म.ज्योतिबा फुले, राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, वामनदादा कर्डक अशा नामवंतांच्या नावे विविध वाडमयीन प्रकारात पुरस्कार देण्यात यावेत, संदर्भ ग्रंथालय समृध्द होण्याच्या दृष्टीने आणि अधिकाधिक वाचक, लेखक, अभ्यासक, संशोधकांना या योजनेचा लाभ व्हावा हा उद्देशही सफल होतो. या वार्षीक र.रू.३ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार निवड समितीतील सभासदांना रू.१०००/- मानधन देण्याबाबत सल्लागार समितीने मान्य केले होते. २००६-०७ यावर्षी सदर स्पर्धेत एकुण २७६ ग्रंथ प्राप्त झाले. त्यातुन निवड करण्याचे काम जिकरीचे व कष्ट प्रद होते हे जाणून निवड समिती सभासदांनी मानधन वाढविण्यासंबंधी तोंडी सूचना केली. यासंदर्भात दि.२६.१.०७ या पुरस्कार वितरण दिनी सभासदांनी मा.महापौर व मा.आयुक्तांची भेट घेऊन चर्चेअंती मानधन रू.३०००/- प्रति सभासद देण्यात आले. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी. तसेच सदर पध्दत भविष्यात देखील अंगीकारण्यात यावी.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ पुरस्कार विजेत्यांना पुरस्कार स्विकारणेसाठी येणे,जाणे निवास,जेवण आदि खर्चासाठी पुरस्कार विजेत्या साहित्यीकांना अतिरिक्त मानधन देणे बाबत मा.महापौर आणि मा.आयुक्त यांनी तोंडी सुचित केल्यानुसार दि.२६.०१.२००७ च्या पुरस्कार वितरण

सोहळयात प्रत्येकी रूपये २०००/- प्रमाणे अदा करण्यात आली. त्यास कार्योत्तर मान्यता मिळावी. तसेच भविष्यातही सदर पध्दत अवलंबावी. राष्ट्रीय पातळीवर चर्चासत्राचे आयोजन करून प्राप्त शोध निबंधाचे प्रकाशन व त्यावर मनपाचा मालकी हक्क या संदर्भाने आणि चर्चासत्राचे सल्लागार समितीने रू.२,५०,०००/- तरतूद मान्य केली होती. तथापि, या संदर्भाने आयोजित बैठकीत उपस्थित सभासदांनी ही रक्कम अपूर्ण असल्याचे सांगून ती वाढविण्यात यावी, असे सुचविले.

डॉ.गंगाधर पानतावणे (सदस्य, सल्लागार समिती) यांनी केलेल्या सुचनेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राकडे पी.एच.डी. चे विद्यार्थी, संशोधक,संशोधक मार्गदर्शक, महाविद्यालयीन व विद्यापीठ प्राध्यापक वर्ग, एम.फील. धारकाचे शोध निबंध, समाज कार्यकर्त्यांचे संशोधन, लेख/ हस्तालिखिते हे असे विविध दस्तावेज मनपाकडे मालकी हक्क घेऊन प्रकाशित करण्याच्या उद्देशाने तसेच मनपातील यशोगाथा ठळक घडामोडींना प्रसिध्दी देण्याच्या उद्देशाने संशोधन संशोधन केंद्रात स्वतंत्र प्रकाशन सेल स्थापन करून या सेलव्दारे महानगरपालिका बुलेटीन **नागरीक** या नावे दरमहा प्रकाशित करण्यास मान्यता व्हावी. संशोधन केंद्रामध्ये तीन मजूर आणि एक समन्वयक एवढेच मनुष्यबळ आहे. संशोधन केंद्राच्या ध्येय धोरण व उद्दीष्टांची पुर्तता करावयाची झाल्यास उद्दिष्टानुरूप मनुष्यबळ असणे आवश्यक आहे. आणि केंद्रासाठी खालीलप्रमाणे मनुष्यबळ मान्य करण्यात यावे. सर्व पदे मानद व करार आऊटसोर्स पध्दतीने असतील.

| | |
|---|---|
| कार्यक्रम समन्वयक तथा ग्रंथालय प्रमुख-१ | द.म.मानधन रू.४,०००/- |
| संगणक ऑपरेटर -१ | द.म.मानधन रू.३,०००/- |

वरील मानधनावर रू.८४,०००/- वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

संशोधन केंद्राचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्नीकरण असल्या कारणाने त्यांच्या निरीक्षण अहवालानुसार खालीलप्रमाणे परिपूर्ण असे कॉम्प्युटर व्यवस्था असणे आवश्यक आहे. तरी स्टेशनरी सह डी.टी.पी.,डेटा,टॅली, इंटरनेट, फॅक्स, लेजर प्रिंटर व वेबसाईट इ.व्यवस्था स्वतंत्रपणे व्हावी तसेच कॉम्प्युटर नामांकित कंपनीचे खरेदी करण्यांत यावे.

सुधारीत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>**संवाद :**</u>

| | |
|---|---|
| सौ.लता दलाल | :काम करून घेणार नंतर प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीसाठी येतो कशासाठी सभागृहाचा अवमान करतात. अगोदर का ठेवत नाही. |
| मा.आयुक्त | :संत एकनाथ रंग मंदीरला फंक्शन चालू होते त्यावेळी मा.महापौर व सर्व पदाधिकारी यांना भेटले, यांचे उपस्थितीत त्या लोकांनी मागणी केली ते देण्यात येईल,त्याप्रमाणे अदा करावे असे म्हटले होते,त्यानुसार कार्यवाही केली आहे. |
| सौ.लता दलाल | :यापुर्वीच्या बैठकीत हा प्रस्ताव मांडला होता चर्चा होवून सर्व सदस्यांना या प्रस्तावाविषयी माहिती देण्याचे मा.महापौरांनी आदेशीत केले होते,सदस्यांना माहिती दिली नाही ती जोपर्यत येत नाही तोपर्यत स्थगिती दयावी. |
| श्री.देसरडा प्रशांत | : दोन महिण्यापूर्वी प्रस्ताव आलेला होता. त्यावेळी अशा भावना व्यक्त केल्या होत्या की,डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या आत्मचरित्रावर अभ्यास व्हावा वाचनालय आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बाबतीत किती लोकांनी संशोधन केंद्रास भेटी दिल्या सल्लागार समितीच्या किती बैठका झाल्या व नागरीकांनी तेथे येवून अभ्यास करावा यासाठी काय प्रयत्न केले. याची माहिती दयावी नंतर निर्णय घ्यावा. |
| श्री.संजय जगताप | :संशोधन केंद्र माझ्या वार्डात येते मान्यता दयावी. |
| सौ.लता दलाल | :या प्रस्तावाची माहिती देण्यासाठी संबधीत अधिकारी नाही. |
| मा.आयुक्त | :उपआयुक्तासह संबधीत अधिकारी मुंबईला एका बैठकीला गेलेले आहे. |
| मा.महापौर | :ज्या विभाग प्रमुखाकडून एखादा प्रस्ताव येतो त्यानी सभेला उपस्थित असणे गरजेचे असून याची दखल घ्यायला पाहिजे. |
| मा.आयुक्त | :कोणत्याही कामासाठी जर कार्यालय सोडायचे असेल तर स्थायी समितीच्या सभेच्या दिवशी मा.सभापती,स्थायी समिती तसेच सर्वसाधारण सभेच्या दिवशी मा.महापौर यांची परवानगी शिवाय जावू नये. |
| मा.महापौर | :उपआयुक्त प्र. यांनी मला कल्पना दिली होती परंतू संबधीत अधिकारी यांनी माझी परवानगी घेतलेली नाही. |

सौ.दला दलाल :संबधीत अधिकारी यांनी परवानगी घेतलेली नाही अशा वेळी प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

मा.आयुक्त :सोमवारी उपआयुक्त (प्रशासन) यांचेकडून खुलासा घेण्यात येईल.

सौ.लता दलाल :महापौरांची परवानगी अधिकारी यांनी घेतलेली नाही हा सभागृहाचा हक्कभंग केलेला असून हंकभगाविषयी ठराव मांडण्याचा आम्हाला अधिकार आहे मंजूर करावा.या कमेटीत पदाधिकारी असावे अशी मागिल बैठकीत चर्चा झालेली होती. त्याचा उल्लेख केलेला नाही.

श्री.मुजीब खान : संशोधन केंद्र स्थापन करण्या मागचा हेतू काय होता या ठिकाणी बाहेरील लोक येवून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य यावर संशोधन करतील सर्व समाजातील विदयार्थी येवून त्याचे बाबतीत माहिती घेवून पूर्ण अभ्यास करतील कार्यालयात येवून विचारणा केली असता मा. आयुक्त नेहमी प्रशासकीय कामासाठी संशोधन केंद्रात गेलेले सांगण्यात येते. प्रशासनाच्या नियमित बैठका खातेनिहाय चौकशी मुलाखती या ठिकाणी घेतल्या जातात चांगल्या कामासाठी ते केलेले आहे. जो हेतू साध्य करण्यासाठी केले होते तेच काम तेथे व्हावे. प्रशासनाला प्रशासकीय काम करण्यासाठी मुख्य कार्यालयात दोन सभागृह आहे या संशोधन केंद्रात रात्री ८ ते ९ वाजेच्या नंतर कुणीही सुरक्षा रक्षक दिसून येत नाही. रोत्रीच्या वेळी काही लोक दारू मागवून खाणारे पिणारे लोक तेथे जमा होतात हे अशोभणीय आहे. याकडे प्रशासन म्हणून मा.आयुक्त यांनी लक्ष दयावे.

मा.महापौर :गंभीर स्वरूपाच्या बाबी स.सदस्यांनी निदर्शणास आणून दिलेल्या आहे त्या बाबतीत तसेच स.सदस्य श्री.देसरडा तसेच सौ.लता दलाल यांनी ज्या सूचना केल्या त्याचा खूलासा करावा.

मा.आयुक्त :या संशोधन केंद्रांत ॲक्टीव्हिटीज देण्यासंदर्भात डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या नावाने एक ग्रंथ पुरस्कार देण्याचे ठरले.ते देण्यासाठी कमेटी केली होती नाव रिसर्च सेंन्टर आहे म्हणून वेगवेगळे लेखन करणे रिसर्च पेपर घेवून त्यांचे संकलन करून एक ग्रंथ पब्लीश करण्याचे पण ठरविले होते त्यानुसार एक ग्रंथ पूर्णपणे तयार झालेला आहे त्यासाठी एक अडोटेरिअल कमेटी केली जेवढे रिसर्च पेपर प्राप्त झाले होते ते सर्व अडोटेरिअल कमेटीला दिले. त्या टेक्नीकल कमेटीने रिसर्च पेपर एकत्रित करून दिले स्थायी समितीच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यासाठी त्याची प्रिन्टींग करून ठेवली आहे. पुर्वी असे अपेक्षित होते की ५०० अभिवादन ग्रंथच विकले जातील परंतू नंतर असे वाटते की १५०० पूुस्तके विकतील त्यानुसार आणखी प्रिन्टींग करून घेवून त्यासाठी जो खर्च वाढणार आहे त्यासाठी परिच्छेद पहिला मध्ये वाढीव खर्चाच्या मान्यतेसाठी आहे. हे ग्रंथ विक्री करणार असून रक्कम पण अपेक्षीत आहे. सुरूवातीला त्यावर महापालिकेला खर्च करावे लागतील. २ लक्ष ग्रंथ छपाईचा खर्च होता तो ५ लक्ष करण्यात यावा. दुसरे असे की ज्यांनी ज्यानी मागिल दोन तीन वर्षाच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर ग्रंथ, निबंध किंवा इतर पुस्तके लिहिली ते मागवून घेतले होते,त्यानूसार ३००-३५० पुस्तके प्राप्त झाली होती. कमेटीतील जे लोक होते त्यांनी ही सर्व पुस्तके वाचून वेगवेगळे मार्कस देवून पुस्तकाची निवड करून ज्यांना ग्रंथ पुरस्कार दिला तो वितरण सोहळा चालू होता. त्यावेळी ज्या कमेटीतील लोकांनी ३०० ते ३५० पुस्तके वाचलेली आहे त्यांनी मोठा वेळ यासाठी दिला म्हणून मानधनची रक्कम वाढवून ३००० रू.करण्यात यावी असे त्यावेळी आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार पेमेंन्ट केलेले कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवला आहे.

श्री.संजय सिरसाट :वर्षभरात कुणाला किती मानधन दिले हा विषय महत्वाचा नव्हता या संशोधन केंद्रात वेगवेगळया विषयावर जवळपास २००० पेक्षा जास्त पुस्तके असतील. विदयापीठातील,कॉलेजमधील किंवा नागरीक असेल ही पुस्तके वाचण्यासाठी किती लोक दररोज येतात. यापूर्वी चर्चा झाली होती किती

नाममात्र फिस ठेवून तेथील पुस्तके लोकांच्या वाचण्यात येतील अशी व्यवस्था करावी. असे म्हटले होते. परंतु कार्यवाही केली नाही. या ठिकाणी जर प्रशासन बदल्या बढत्या चौकशा करण्या संदर्भात बैठका घेत असतील तर योग्य नाही. हीच पध्दत श्रीमंत शिवाजी महाराज पुराण वस्तुसंग्रहालयाच्या संदर्भात बोललो होतो की महापालिकेच्या ७३ शाळा मधील विदयार्थ्यांना या संशोधन केंद्रातील शिवकालीन जे वस्तू होत्या त्या पाहण्यासाठी व्यवस्था करावी. लाखो रूपये खर्च केले त्याचा समाजासाठी उपयोग होता याचाही विचार केला पाहिजे.मौलाना अबुल कलाम आझाद केंद्र तयार केले तेथे काय ॲक्टीव्हिटीज दिल्याज जात आहे.तसे प्रस्ताव आले तर या सभागृहालाही उत्सुकता वाटेल. छत्रपती शिवाजी म्युजियम मध्ये आजपर्यत किती शाळेतील विदयार्थ्यानी व्हिजीट दिल्या आहे. भारत माता मंदीर तयार केले अनेक स्वातंत्र्य सैनिकाचे तेथे छायाचित्र लावण्यात आले ते दाखविले जाते का? माझ्या माहिती प्रमाणे कमेटीमधील पुर्ण सदस्य आज नाही जे आहे ते जातील. एक सदस्य किती काम करणार आहे. चांगल्या लोकांना यात समावेश करून घ्यावा जे नागरीकांना प्रसिध्दी देतील. १० पुस्तके सुध्दा बाहेर वाचण्यासाठी जात नाही असे वाटते. लाखो रूपये खर्च झाले.

मा.आयुक्त :दोन्ही रिसर्च सेंन्टरला तेथे रिसर्च करणार याचा विचार करून नाव दिलेले आहे. त्या रिसर्चला वाव देण्यासाठी काय ॲक्टीव्हिटीज दयायला पाहिजे म्हणून सगळीकडून रिसर्च पेपर मागवले

श्री.संजय सिरसाट :विदयापीठ मध्ये जे कुणी पीएचडी करीत असतील त्यांना आवश्यक ती साधन सामुग्री त्यावेळी जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी केलेले आहे ते वाचावयास मिळावे हा उददेश होता. परंतू तेथे जे ग्रंथ ठेवले गेले ते लोकांना वाचण्यात आले पाहिजे. विदयापीठात दरवर्षी एक किंवा दोन विदयार्थी डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या नावावर पीएचडी करतात. दोनच विदयार्थीसाठी हे चालू केलेले नसून पुर्ण शहरासाठी चालू केलेले आहे.

मा.आयुक्त :आपल्याकडे दोन सॅल्युसेन्सचे स्टुंडन्स कनेक्टेड आहे जी लायब्ररी आहे ती सर्वासाठी खुली आहे अशाच प्रकारची लायब्ररी मौदाला अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रांत पण केलेली आहे. जास्तीत जास्त लोकांनी येवून तेथे वाचन केले पाहिजे महापालिकेला आनंदन होणार आहे ते वाचन करीत नाही म्हणून प्रत्येक रविवारी डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या विचारावर वेगवेगळया व्यक्तीना विचार मांडण्याची संधी देण्याचे सुरूवात केली होती फार दिवस चालू होते. जी तीन ॲक्टीव्हिटीज केलेल्या आहे त्यात काव्यग्रंथ तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरावर चांगले केलेले लिखाण तसेच निंबध यातून चांगली निवड करून पुरस्कार देणे, प्रत्येक रविवारी त्यांचे विचारावर लेक्चरर देणेची ॲक्टीव्हीटी सुरू केली होती. या ठरावात ग्रंथ पब्लीकेशन साठी पैसे तसेच कमेटीतील लोकांना ३००० रू.मानधन,चांगले पुस्तक लिहिले म्हणून त्या लोकांना प्रवासासाठी २००० खर्च तसेच मासिक पत्रिका महापालिकेतर्फे छापण्यात यावी रिसर्च सेंन्टर मध्ये हे काम चालते ती सर्व माहिती देण्यासाठी नागरीक म्हणून एक मासिक पत्रिका काढणे व या खर्चाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव आहे. समन्वयक ग्रंथालय प्रमुख तसेच संगणक ऑपरेटर अनुक्रमे ४०००,३००० रू वर नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव ठेवलेला आहे.ॲक्टीव्हीटीजच्या बाबतीत आज रोजी मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रांत ३८० विदयार्थी संगणकाचे शिक्षण शुल्क न देता घेत आहे. लॅब्ररी तयार केली असून दोन्ही रिसर्च सेंन्टरमध्ये कालांतराने ॲक्टीव्हिटीज देण्याचे कार्यवाही करावी लागेल.एक हॉल चांगल्याप्रकारे तयार केलेला आहे ज्यात चांगल्या प्रकारे डॉ.बाबासाहेबाच्या विचारावर लेक्चरर होवू शकतात.

श्री.संजय सिरसाट :श्रीमंत शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयास महापालिकेच्या विदयार्थ्यानी भेटी दिलेल्या आहेत का? महापालिकेचे अधिकारी कर्मचारी यांनी कधी जावून भेट दिली का?

मा.आयुक्त :श्रीमंत शिवाजी महाराज पुराण वस्तुसंग्रहालयास तरी अनेक लोक भेटी देतात परंतू उर्वरीत दोन रिसर्च सेंन्टरला तेवढा प्रतिसाद मिळत नाही डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टला चांगले म्युजियम आहे होर्डीगद्वारे आणखी प्रसिध्दी करावी लागेल असे वाटते.

सौ.अजरा खान :मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात चांगली लायब्ररीअसून फक्त त्यांचे विचारा संबधीत पुस्तके आहे याच बरोबर शैक्षणिक, लेखक तसेच कवी यांची पुस्तके ठेवल्यास येणा-या वाचकांना चांगला फायदा होवईल.वेगवेगळया विषयावरील पुस्तके असणे गरजेचे आहे. सदर ही इमारत मोठी असून कर्मचारी संख्या कमी रात्रीच्या वेळी काही अनुचित प्रकार होवू शकतात त्यासाठी एक शिफ्ट मध्ये दोन सुरक्षा रक्षक तसेच इतर कामासाठी जास्तीचे कर्मचारी देण्यात यावे.

सौ.लता दलाल :तीनही रिसर्च सेंन्टरसाठी वर्षातून करोडे रूपये खर्च होतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरच्या बाजूला विचित्र परीस्थिती आहे. श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तुसंग्रहालय मध्ये स्वच्छता नाही असलेले पुतळे तसेच पेटया त्यावर एक-एक इंच धुळ साचलेली दिसून येते.वरच्या बाजूने छताचे पाणी पडते समोरच्या गेटवर मोठया प्रमाणात धुळ दिसून येते. असे असेल तर जो खर्च होतो तो कुठे केला जातो. असा विचार पडतो.त्यासाठी पर्यटन विभागास सक्षम केले पाहिजे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरला व्याख्याने घेतली जात होती का बंद पडली, यास जबाबदार कोण पैसे संपले हा विषयच होवू शकत नाही.आणखीही विचारवंत आहे थोर पुरूष आहे त्यांची सुध्दा का व्याख्याने ठेवली जात नाही सर्व वक्त्यांना बोलवावे व्याख्याने बंद होवू नये तीन ही वास्तु या पर्यटनाचा आणि इतिहास तसेच महापुरूषांना समजून घेण्यासाठी तीन स्थळे या शहरात आहे. दुरावस्था होत आहे. हा विभाग सांस्कृतिक विभागाकडे दयावा.

श्री.संजय जोशी :या प्रस्तावात परीच्छेद क्र. ३ वर सल्लागार समितीच्या मान्यतेनुसार १०००रू मानधन देण्याचे मान्य केले होते असे दिले. सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता उच्च अधिकार त्या सल्लागार समितीला आहे का, या सभेच्या अधिकारावर गदा येवू नये.हा ठराव कुणी सादर केला या प्रमाणेच भारत माता मंदीर असून तीन वर्षात १०-१० लक्षची तरतुद केली जाते परंतू १० रू. खर्च केले नाही.गोलमोल प्रस्ताव सादर करून लाखो रूपये दुस-यांचे नावाने मंजूर करून घेणे योग्य नाही.

श्री.मिलींद दाभाडे :डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेन्टमध्ये प्रशासकीय बैठका मुलाखती होतात त्या होवू नये तसेच प्रवेश करतो त्याचे उजव्या बाजूने नर्सरी असून त्या बाजूने महापालिकेने संरक्षित भिंत बांधून घ्यावी.तसेच रिसर्च सेंन्टर मधून मागिल बाजूने टेकडीकडे जाण्यासाठी रस्ता आहे तो बंद करून बाजूने रस्ता तयार करून दयावा.

श्री.कचरू मोरे :अनेक वेळा हा ठराव सभागृहात मान्यतेसाठी आलेला आहे जी चूक झाली असेल ती दुरूस्त करून घ्यावी यास मान्यता देण्यात यावी निवड समितीची चूक झाली असेल. एकीकडे एक कोटी मंजूर करतो, हा कशासाठी स्थगीत ठेवता. अल्पसंख्याकांना अधिकार नाही का, प्रत्येक वेळी स्थगित ठेवणे योग्य नाही. कुणी बोलणार नसेल तर नेहमीच वाटेल तो निर्णय घेणार का? समाजाचे लोक आम्हाला विचारणा करतात.

श्री.संजय जगताप :प्रस्ताव मंजूर करावा.

श्री.प्रशांत देसरडा :मंजूर करण्यास विरोध नाही.प्रशासनाला काही प्रश्न विचारलेले होते. त्यांचे उत्तर मिळाले नाही प्रशासनाची बाजू कुणी घेवू नये.

श्री.संजय जोशी :सभागृह कुठल्या एका समाजासाठी चालविले जात नाही.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरवर बोलण्याची जबाबदारी ठरावीत सदस्यांनीच घेतली काय ?आम्हाला समाज विचारतो म्हणजे काय आम्हाला त्याचे बध्दल आस्ता नाही काय?हे वाक्य वगळावे.

मा.महापौर :हे सभागृह सर्वांसाठी आहे हा विचार समोर ठेवून सदस्यांनी मत मांडले पाहिजे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अनेक वेळा हा ठराव सभागृहात आलेला आहे स्थगिती न देता मान्यता दयावी.

श्री.मिलींद दाभाडे :कुस्ती व कब्बडी खेळासाठी लाखो रूपये खर्च केले जातात परंतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंन्टरच्या संदर्भात आलेल्या प्रस्तावास जाणीपूर्वक विरोध होतो.

मा.महापौर :डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे आपणा सर्वांचे आहेत या आधीच त्यांचे नावाचा एक ठराव मंजूर केला असून असे बोलणे योग्य नाही. संबधीत विभाग प्रमुख यांनी माझी परवानगी नघेता गैरहजर आहे याची काळजी प्रशासनाने घेतली नाही.

याचवेळी स.सदस्य मा.महापौर डायस समोर जावून मोठमोठयाने बोलतात काहीही ऐकू येत नाही.

मा.महापौर :सर्व सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे. जे पुरस्कार देण्यात येतात त्या सर्व पुरस्कारच्या सोबतच स्वामी विवेकानंद,वि.दा.सावरकर, सरदार वल्लभभाई पटेल यांचे नावानेही पुरस्कार देण्यात यावे. सल्लागार समितीवर महापौर,उपमहापौर,स्थायी समिती सभापती,सभागृहनेता,विरोधी पक्ष नेता त्या वार्डाचे स.सदस्य तसेच दोन सदस्य श्री.संजय जोशी व श्री.अ.रशिद खान (मामू) यांची नियुक्ती करण्यात यावी. महापालिकेचे जे नागरीक बुलेटीन दर महिण्याला काढावयाचे ते काम सांस्कृतिक विभागाच्या वतीने करण्यात यावे. सांस्कृतिक अधिकारी या बुलेटीनची माहिती आणि प्रसिध्दी करतील हा विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभिवादन (गौरव) ग्रंथाच्या छपाईसाठी रू.५.०० लक्ष तरतूद ठेवण्यास,ग्रंथात समाविष्ट लेखांचे लेखकास रू.१०००/- सन्मान चिन्हासह देण्यास,प्रस्तावात नमूद पुरस्कारासह स्वामी विवेकानंद, वि.दा.सावरकर,सरदार वल्लभभाई पटेल यांचे नांवेही पुरस्कार देण्यास,पुरस्कार निवड समितीतील सभासदांना रू.३०००/- मानधन देण्यास,पुरस्कार वितरण सोहळ्यास झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेस,सल्लागार समितीवर महापौर,उपमहापौर,सभापती स्थायी समिती,सभागृह नेता, विरोधी पक्षनेता,स.सदस्य श्री.संजय जोशी,स.स.श्री.रशिद खान मामू यांचा समावेश करण्यास तसेच नागरीक हे बुलेटीन दर महिन्याला सांस्कृतिक विभागाच्या वतीने काढण्यास आणि संशोधन केंद्रासाठी प्रास्तावित मनुष्यबळ मानद व करार पध्दतीवर (आउट सोर्सींग) भरण्यास व प्रास्तावित स्टेशनरी, साहीत्य उपलब्ध करून घेण्यास येणाऱ्या खर्चासह सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३४ :**

दिनांक २६.१०.२००७ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.११८१/६ च्या संदर्भात झालेल्या निर्णयाप्रमाणे

सहाय्यक संचालक नगर रचना,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी सन १९९२ ला विकास नियंत्रण नियमावली मंजुर झाली आहे. त्यात कालानुरूप काही बदल अपेक्षित आहेत. त्यातच आता शासनाने औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी जिना,पॅसेजेस आदी चटई क्षेत्र मुक्त करण्यास मान्यता दिली आहे. त्याचप्रमाणे हस्तांतरणीय विकास हक्क हा नियम ही (T.D.R.) लागू झाला आहे. त्यामूळे भूखंडावर अतिरीक्त बांधकाम करणे व पर्यायाने वाढीव वापर क्षमता प्राप्त झाली आहे. तसेच बदलत्या जिवनमानानुसार वाहनतळाचे आवश्यकतेतही फरक पडला आहे. त्यामूळे विकास नियंत्रण नियमावलीत काही बदल पूढील प्रमाणे प्रस्तावित करण्यात येते.

०१. औरंगाबाद महानगरपालिकेने प्रस्तावित केल्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-३७ नुसार फेरबदलास शासन अधिसूचना क्रमांक टिपीएस-३००/१८३/ प्र.क्र.१३९/२००१/ नवि-३०,दिनांक १३.०१.२००४ नुसार नियम १५.५ ई मध्ये बदल करून इमारतीची जास्तीत जास्त उंची २४.०० मीटर एवढी अनुज्ञेय केली आहे.

मात्र त्यानंतर औरंगाबाद शहरासाठी सामाईक जिने, Passages, Lobbies चटई क्षेत्र मुक्त करण्यास तसेच हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R.) ही योजना औरंगाबाद महानगरपालिकेसाठी लागू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. साहजीकच त्यातून मिळणारा अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I.) वापरण्यासाठी इमारतीची उंचीत वाढ होणे अपेक्षित आहे. शिवाय इमारती भोवती जास्तीत जास्त अंतर सोडून बांधकाम करण्याची संबंधीताची तयारी दाखविल्यास शहर नियोजनासाठी हा चांगला बदल संभवतो. तसेच त्यामूळे तळमजल्यावर अतिरीक्त वाहनतळ क्षेत्र उपलब्ध होवू शकते. वायुविजनासाठीही या बदलामूळे सुधारणा होवून पर्यावरण सुधारण्यास मदत होईल. या बाबी लक्षात घेता इमारतीच्या जास्तीत जास्त उंचीसाठीची मर्यादा रद्द करण्याचा प्रस्ताव आहे. त्यामूळे विकास नियंत्रण नियमावलीचे कलम १५.५ ई मध्ये बदल करणे व अपेडिंक्स एन अंतर्गत टेबल एन मधील स्तंभ ८ (आठ) वगळण्याचा प्रस्ताव आहे.

०२. विकास नियंत्रण नियमावलीतील सध्याच्या वाहनतळाच्या तरतूदीत वाढ करणे अपरिहार्य वाटते. सदर विकास नियंत्रण नियमावलीतील टेबल ७ अंतर्गत असलेल्या तरतूदीत पूढील प्रमाणे बदल प्रस्तावित आहे.

सध्याची तरतूद :-

**TABLE 7**
**OFF STREET PARKING SPACES**

| Sr No | Occupency | One parking space for every | |
|---|---|---|---|
| | | Motor vehicle parking | Two wheeler parking |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 01 | Residential | | |
| | i. Muliti-family residential | a. 2 tenement having carpet area 101 to 150 sq.m. | a. One tenement having carpet area upto 100 sq.m. |
| | | b. 1 tenment ecceeding 150 sq.m. | |
| | ii. Lodging establishment tourist homes and hotels with lodging accommodation | 6 Guest rooms | |
| | iii. Resturants | 50 sq.m.carpet area | 25 sq.m.carpet area |
| 02 | Educational | 100 sq.m.or lraction thereof of the administrative area public servic area | 50 sq.m.or lraclion there of the adminstrailve area and public service area. |
| 03 | Institutional (Hospital, Medical Institudtions) | 20 beds | 10 beds |
| 04 | Assembly (Theatres, Cenema house, concert halls, Assembly Halls including those in Colleges and Houtels and audiloriums of educational buildings.) | 40 seals | 8 seals |
| 05 | Government or Semi-public or Private Business Building | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 06 | mercantiles (Markets Departmental stores, Shops and commercial users.) | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 07 | Wholesale establishments | 100 sq.m.carpet area or fraction thereof | 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 08 | Industrial | 200 sq.m.carpet area of fraction thereof | 100 sq.m.carpet area of fraction thereof |
| 09 | Storage | 400 sq.m.fraction thereof | 200 sq.m.fraction thereof |

**प्रस्तावित तरतूद :-**

**TABLE 7**
**OFF STREET PARKING SPACES**

| Sr No. | Occupency | parking space required | |
|---|---|---|---|
| | | Motor vehicle parking | Two wheeler parking |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 01 | Residential | | |
| | i. Multi-family residential | a. One for every tenement having carpet area 90 sq.m. and above<br>b. Two for every tenement having carpet area 150 sq.m. and above | c. One for every tenement having carpet area upto 75.0 sq.m.<br>d. Two for every tenement having carpet area 150 sq.m. and above |
| | ii. Lodging establishment tourist homes and hotels with lodging accommodation | One for every Three Guest room's | |
| | iii. Resturants | One for every 50 sq.m.carpet area | One for every 25 sq.m.carpet area |
| 02 | Educational | One for every 100 sq.m.or lraction thereof of the administrative area public service area | One for every 50 sq.m.or lraction there of the adminstrailve area and public service area |

| | | | |
|---|---|---|---|
| 03 | Institutional (Hospital, Medical Institudtions) | One for every 20 beds | One for every 10 beds |
| 04 | Assembly (Theatres, Cenema House, concert halls, Assembly Halls including those in Colleges and Houtels and audiloriums of educational buildings.) | One for every 20 seals | One for every 8 seals |
| 05 | Government or Semi-public or Private Business Building | One for every 100 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 06 | mercantiles (Markets Departmental stores, Shops and commercial users.) | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 25 sq.m.carpet area or fraction thereof |
| 07 | Wholesale establishments | One for every 200 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 50 sq.m.carpet area or fraction thereof |
| 08 | Industrial | One for every 200 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 100 sq.m.carpet area or fraction thereof |
| 09 | Storage | One for every 400 sq.m.carpet area or fraction thereof | One for every 200 sq.m. fraction thereof |

०३. औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील दाटीवाटीचे क्षेत्रा बाहेर (गावठाण क्षेत्रा बाहेर) नोंदणीकृत शैक्षणिक संस्था तसेच नोंदणीकृत धर्मदाय संस्थाची (Hospitals) यांचेसाठी वाढीव चटई क्षेत्राची तरतूद नाही. नुकतेच शासनाने तारांकित हॉटेल्स् ला ०.५० एवढा वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक (नजराणा शुल्क (Premium) भरून) अनुज्ञेय केला आहे. शिवाय दाटीवाटीचे क्षेत्रासाठी (गावठाण) आधीच विकास नियंत्रण नियमावलीतील नियम १.५० ऐवजी २.२५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक इतर इमारतीसाठी म्हणून अनुज्ञेय आहे. त्यामूळे दाटीवाटीचे क्षेत्रा बाहेरील नोंदणीकृत शैक्षणिक संस्था व नोंदणीकृत धर्मदाय संस्थांचे Hospitals यासाठी ०.५० एवढ्या चटई क्षेत्राची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीचे Appendix N चे कलम N २.२.२ व N २.२.३ चे खाली Note म्हणून समाविष्ट करणेचा ख्वालीलप्रमाणे प्रस्ताव आहे.

**Note - For N 2.2.2 & N 2.2.3**

An extra F.A.R. up to 0.50 may be permited by Aurangabad Municipal Corporation exclusively for Registered Educational and registered Charitable trusts Hospitals purposes subject to payment of permium equal to 10% of land cost as par Redy Reckenar rate payable to Aurangabad Municipal Corporation.

Provided further that no condonation in the required open spaces, parking spaces and other requirements as per Reulations shall be allowed while granting sach a additional FSI

०४. औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समुह गृह निर्माण योजने बाबत स्पष्ट व्याख्या व त्या संबंधीच्या तरतुदी नाहीत. त्यात प्रामुख्याने इमारतीच्या उंचीच्या अनुषंगाने सामासिक अंतरे, विविध उत्पन्न गटांसाठीचे घरांना सामासिक अंतरे आदि बाबींचा समावेश नाही. समुह गृह निर्माण योजना प्रकरणाची वाढती संख्या लक्षात घेता अशा योजनेची व्याख्या करणे व त्यासंबंधीच्या तरतुदी करणे आवश्यक होत आहे. करीता सिडकोच्या विकास नियंत्रण नियमावलीतील तशी व्याख्या व तरतूदीत काही बदल करून व काही वगळून खालीलप्रमाणे लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्रमांक १३.२.५ म्हणून समाविष्ट करण्यांत येईल.

a. **Group Housing Scheme :-** In the Group Housing Scheme, the following regulations shall apply :

i Entire area under layout shall be treated as one single polt and the net polt area in a Group Housing scheme shall be regarded as the area excluding the land under roads, and spaces if any.

vi The total covered up area shall not exceed 1/2 of the net plot area and development shall be subject to maximum F.S.I. of 1.0 of the net plot area.

vii The distance between any building and approach will be 2.25 m. for ground floor and ground+one floor, 3.0 m. for ground + Two floor and 4.5 m. for ground+Three floor and above. provided that in case to building fronting on any majer road the margin should be 4.5 m.

viii Distance between any two building shall be 2.0 m., if they are ground floor structure, 3.0 m. if they are ground and one upper floor, 4.5 m. if they are G+2 upper, 6.0 m. if they are G+3 upper and the side margins from plot boundaries shall be 2.25 m. 2.30 m., 3.0 m., and 4.5 m. respectively.

ix Notwithstanding the above, in case of Group Housing with one room dwelling unit and two room dwelling units if the buildings have ground floor only and further there are no doors or windiws in the side walls, the minimum distance between the buildings may be reduced to 1.5 m. only along a street and nil along an approach/ pathway.

सर्वसाधारणपणे सर्वच नियोजन प्राधिकरणत ०.७५ एवढा चटई क्षेत्र निर्देशांक किंवा खुली जागा व अंतर्गत रस्ते वगळता उरणारे निव्वळ क्षेत्र एवढाच चटई क्षेत्र निर्देशांक देय केला आहे. करीता तसा बदल औरंगाबाद महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत करण्याचा प्रस्ताव आहे. त्यासाठी ०.७५ किंवा खुली जागा व अंतर्गत रस्ते वगळता उरणारे निव्वळ क्षेत्र या पैकी जे जास्त असेल तेवढे अनुज्ञेय करण्यात येईल.

०५. भूखंडाची वापर क्षमता वाढल्याने वाहनतळ व Storage ची वाढीव आवश्यकता भासणार आहे. ही बाब लक्षात घेता बेसमेंटसाठीच्या नियम क्रमांक १७.१२ मध्ये काही बदल आवश्यक आहेत.

१७.१२.२ (b) मध्ये पूढील मजकुर समाविष्ट करणे आवश्यक आहे.

i In case of multi tier basement adequate mechanical light and ventilation should be provided to the satisfaction of the commissioner and should be certified by the authority as supposed to be appropriate by commissioner from time to time.

iii In case of multi tier basement suitability of the site should be certified by the city Engineer.

iv In the requirment mentioned in 'C' in 17.12.2 the word 'any' should be replaced by 'upper level/top' basement.

वरीलप्रमाणे बदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस्तव तथा कलम-३७ नुसार पूढील कार्यवाही करण्यास आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांना अधिकार देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी : शासनाचा दिनाक १३-१-०४ चा जो जीआर आहे. फेरबदल करण्याची अधिसुचना आहे ती बैठकीच्या आधी चार पाच दिवसापूर्वी सचिवांना मागणी केली होती, सचिवांनी सहाय्यक संचालक, नगर रचना यांचेशी पत्रव्यवहार केला होता. प्रत मिळाली नाही. त्या अधिसुचनेत नेमके काय आहे व काय सुधारणा करायची आहे. हे सुध्दा सभागृहाला माहिती मिळालेली नाही. त्यामूळे हा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा.

श्री.संतोष जेजूरकर :स्थगिती दयावी.

श्री.अ.रशिद खान : डी सी रूल नुसार बांधकाम परवानगीच्या अगोदर जागा घेतली जाते एअर पोर्टच्या बाहेरील १० हजार नागरीकांना त्रास आहे. १४ मीटरच्या वरती त्याची परवानगी आहे.४७० पूढे प्रत्येक संचिका त्यांचेकडे पाठवून परवानगी घेण्यासाठी २ वर्ष लागतील यासह दुरूस्ती मागवावे. ४७० च्या पूढे २० मि. पर्यत काम करू शकत नाही.

श्री.संजय जोशी :जेंव्हा ठराव सचिवाकडे येतो त्यासोबत पूर्ण कागदपत्र दयावे असे नियम आहे. सचिवांनी पत्र दिल्यानंतरही मला माहिती का दिली नाही.

नगरसचिव :स.सदस्य श्री.संजय जोशी यांनी प्रत्यक्ष सूचना केल्याप्रमाणे सहा.संचालक नगररचना यांना दिनांक १३.२.०८ रोजी जा.क्र.मनपा/नस/महापौर/२००८/ १४३ अन्वये पत्र पाठविले त्या विभगास १४.२.०८ रोजी पत्र मिळालेले आहे. त्याची प्रत मा.महापौर यांना पण दिली आहे.

श्री.अ.रशिद खान :यामध्ये एनओसी एअरपोर्ट कडून घ्यायची आहे. गुंठेवारीमध्ये इमारत तयार झाली हे इतके जरूरी आहे १० हजार लोकांना त्रास आहे. एकत्रित एनओसी साठी पाठवावे.

मा.महापौर : हा प्रस्ताव पुन्हा बैठकीत सादर करण्यात यावा.

**<u>ठराव :</u>**

सदर प्रस्ताव पूढील सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास मान्यता देण्यांत आली.

**<u>विषय क्र. १३५ :</u>**

<u>दिनांक ३१.०१.२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.७० च्या संदर्भात झालेल्या निर्णयाप्रमाणे</u>

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, विद्यानगर या मंजुर रेखांकनातील न.भु.क्र.१५१८९ ते १५१९४ यांना त्यांचे भुखंडाचे पुर्व बाजुने सद्यःस्थितीमध्ये रस्ता नसल्याचे आढळून आले आहे.

मुळ मंजुर रेखांकन व नगर भुमापन अभिलेखानुसार (शीट क्र.३०७) विद्यानगर या रेखांकनात वरील नमूद नगर भूमापन क्रमांक १५१८९ ते १५१९४ च्या पुर्व बाजुने अंदाजे २.०० मीटरची सर्व्हीस लेन दर्शविलेली आहे. तथापी वरील नमूद प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर गल्लीची जागा उपलब्ध होत नाही.

असे असले तरी या रेखांकनाच्या स्थळावर पुर्णतः झालेला विकास व स्थळावर विजयनगर रेखांकनातील भूखंडधारक ज्यांचे न.भु.क्र.१५१८७/अ/१ ते ७ यांनी तारकुंपण केल्याने विद्यानगर रेखांकनातील वरील सहा भूखंड धारकांचा रस्ता बंद झालेला आहे.

तसेच विद्यानगर रेखांकनातील भूखंड धारकांनी पोच रस्ता उपलब्ध करून देणेकरीता जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच (Consumer court) मा.जिल्हा न्यायालय येथे दावे दाखल केलेले आहेत.

मा.जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांनी विद्यानगर रेखांकन धारकांस त्वरीत रस्ता उपलब्ध करून देणे बाबत आदेशीत केले आहे व अद्याप रस्ता उपलब्ध करून देण्यात आलेला नसल्यामुळे या बाबत मा.न्यायालयात अवमान याचिका दाखल झालेली आहे. तसेच मा.जिल्हा न्यायालय यांनी दि.१०/१०/२००६ रोजी मार्गदर्शक निर्देश दिले असून यानुसार विजयनगर रेखांकनातील भूखंड ज्यांचे नगर भूमापन क्रमांक १५१८७/अ/१ ते १५१८७/अ/७ आहेत. ह्या भूखंडाचे पुर्वेकडील बाजूकडून ४.०० मीटर रूंदीची जागा रस्त्यासाठी घेण्याचे व त्या बदल्यात या भूखंड धारकास वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक देणे व सामासिक अंतरामध्ये आवश्यक सवलती देणे बाबत निर्देश दिलेले आहेत. असे असले तरी जागेवर संपूर्ण वस्तुस्थिती व विकास नियंत्रण नियमावलीनुसार ७.५० मीटर रूंदीचा रस्ता करणे आवश्यक आहे.परंतु उर्वरीत ३.५० मीटरची जागा विद्यानगर रेखांकनातील भूखंडधारक ज्यांचे नगर भूमापन क्रमांक १५१८८ ते १५१९४ आहेत. ते भूखंडाच्या पश्चिम बाजुकडील जागा रस्त्याकरीता देण्यास तयार नाही.

मा.जिल्हा न्यायालय यांचे आदेश व जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचमध्ये दाखल झालेली आवमान याचिका उक्त नमूद रस्ता करीता जागा देणे बाबत दोन्ही रेखाकंनधारकामध्ये अद्याप कोणतीही तडजोड,निर्णय झालेला नसल्यामूळे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार किमान ७.५० मीटर रूंदीचा विकास योजना रस्ता यामध्ये विजयनगर रेखाकंनामधून मा.न्यायालयाच्या निर्णयानुसार ४.०० मीटर व उर्वरित क्षेत्र ३.५० मीटर विद्यानगर रेखाकंनातील भूखंडामधून घेवून रस्ता प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

करीता पूर्वी विषय क्र.६९६/१० दिनांक २०.०१.२००७ मा.सर्वसाधारण सभेमध्ये विजयनगर व विद्यानगर या दोन रेखाकंनामधील नमूद भूखंडासाठी ६.०० मीटर रूंदीचा ना-विकास योजना रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ नुसार तयार करण्याचा मंजूर करण्यांत आलेला प्रस्ताव रद्द करणे व वरीलप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार ७.५० मीटर रूंदचा विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संतोष जेजूरकर : मा.आयुक्तांनी सविस्तर खुलासा करावा.

श्री.संतोष खेंडके :हा विषय मंजूर करण्या अगोदर माझी सूचना आहे.या ठिकाणी क्लिअर होत असेल तरच मंजूर करावा. कारण विजयनगर रेखांकनापासून म्हणजे विजयनगर मध्ये राहणारे जे नागरीक आहे. ते २० वर्षापासून त्यांचे तेथे त्याचे घर असून वास्तव्य आहे. महापालिकेकडून त्यांनी रितसर परवानगी घेवून घरे बांधलेली आहे आज विदयानगरपासून तिकडे ७.५ मीटर घेतली तर जवळपास ३.५ मीटर मध्ये त्याची घरे येवून ते पडू शकते म्हणून त्याचे पोर्च पासून ७.५ मी इकडे विदयानगरमध्ये मोजणी करून घेण्यात यावे.असे मा. आयुक्तांनी म्हटल्यावरच तो विषय मंजूर करावा.

श्री.अ.रशिद खान :यामध्ये झाडेही आलेली आहे ३० वर्षापूर्वी परवानगी दिलेली आहे. त्याची बॉन्ड्री सोडून आतून निशानी केली. ते १ मी.१.५ मी.काही ठिकाणी १/२ मी. आहे. तेथून ७.५ मीटरची मोजणी करून कार्यवाही करावी.

डॉ.भागवत कराड :मी महापौर असतांना सुध्दा हा विषय सभागृहासमोर आलेला होता त्यावेळेस ६ मी.चा असावा असे होते आता आता ७.५ मी.चा आलेला आहे. या संदर्भात ग्राहक मंच तसेच इतर मा.जिल्हा न्यायालयात केसेस चालू असून महापालिका सुध्दा मा.न्यायालयात गेलेली आहे. येथील नागरीकाना व पुढच्या नागरीकांना सुध्दा रस्ता पाहिजे सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेवून हा विषय मंजूर करावा परंतू पूर्व बाजूची घरे सुध्दा पडू नये त्यांचे कुंपण भिंत तुटले तरी चालेल त्यांचे पोर्च पासून ७.५ मी. रस्ता करण्यास मंजूरी देण्यात यावी. दोघांचेही नुकसान होणार नाही. नागरीकांना रस्ता मिळेल व अनेक दिवसापासून जो वाद चालू आहे तो मिटेल.

मा.महापौर :या प्रस्तावात नागरीकांचे नुकसान होवू नये म्हणून पुर्व बाजूने तेथील नागरीकांच्या घराच्या पोर्च पासून पूढे ७.५ मी.रस्ता करण्यात यावा. विषय मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, ७.५० मी. रूंद रस्ता तयार करणेसाठी प्रस्तावित रस्त्याच्या पूर्व बाजूने असलेल्या विद्यमान घरांच्या पोर्च पासून ७.५० मी. रूंद रस्त्याची आखणी मंजूर विकास योजनेमध्ये दुरूस्त करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही करणे करीता आणि सर्वसाधारण सभा दि.२०.०१.२००७ अन्वये ६ मी. रूंद ना-विकास योजना रस्ता तयार करण्याचा प्रस्ताव क्रं.६९६/१० रद्द करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र. १३६ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक २६ डिसेबंर १९९९ पासून महानगरपालिकेचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय सुरू करण्यांत आलेले आहे. दिनांक ३१ मे १९९७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये ठराव क्र.२१/८ नुसार महानगरपालिकेच्या श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालयासाठी करार करून पुरातन वस्तु मिळविण्यात आल्या. या करारानुसार क्युरेटर या पदावर श्री.सर्वेश नांद्रेकर व बुकींग कारकून म्हणून श्री.शेख जावेद शेख अमजद यांना अस्थाई स्वरूपात घेण्यात आले. संग्रहालयाची पूर्ण उभारणी झाल्यानंतर या कर्मचाऱ्यांना संग्रहालयाच्या सेवेत कायम करण्याचे या करारात नमूद करण्यांत आलेले असून दिनांक १९ जून १९९९ च्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.४३/४ मध्ये संग्रहालयासाठी पदनिर्मिती करण्यांत आली. परंतू आजपर्यंत सदरील कर्मचाऱ्यांना आस्थापनेवर कायम करण्यात आलेले नाही.

करीता उपरोक्त नुसार या तृतीय श्रेणीतील दोन्ही कर्मचाऱ्यांना महानगरपालिका आस्थापनेवर कायमस्वरूपी करणेचा प्रस्ताव मंजूरीस्तव व सदर प्रस्ताव मंजूरीनंतर शासनाकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठविणेस मा.सर्वसाधारण सभेस सादर.

सुचक : श्री.अनिल जैस्वाल अनुमोदक : श्री.संजय केनेकर, श्री.महेश माळवतकर

**संवाद :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने दुरूस्त प्रस्ताव लेखी दिलेला आहे.

श्री.अ.रशिद खान : या कर्मचाऱ्यांना कायम सेवेत घेता येते का प्रशासनाने खूलासा करावा.

श्री.संजय केनेकर : दुरूस्ती प्रस्ताव दिला आहे.

डॉ.भागवत कराड : या विषयाच्या अनुशंगाने दुरूस्त प्रस्ताव आलेला आहे तो सचिव यांनी वाचून दाखवावा.

नगर सचिव : विषय क्र. १३६ च्या संदर्भात सुचक व अनुमोदक यांनी लेखी स्वरूपात दुरूस्ती प्रस्ताव दिलेला आहे की, विषय क्र. १३६ मध्ये मागणी नुसार सध्या दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या २६८ कर्मचा-यांचाही प्रस्ताव मंजूर करून शासनाकडे पाठविण्यात यावा विषयाकिंत प्रस्तावामध्ये असलेली पदे ही २६८ मध्ये समाविष्ट आहे त्यामूळे त्यांची वेगळी मागणी करणे योग्य वाटत नसल्याने सर्व कार्यरत कर्मचा-यांचा प्रस्ताव शासन दरबारी पदे भरण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यात यावा असा दुरूस्ती प्रस्ताव आलेला आहे.

श्री.अ.रशिद खान : यास विरोध नाही फक्त माहिती घेत आहे.या कर्मचा-यांना सेवेत कायम करू शकतो का प्रशासनाने खूलासा करावा

श्री.संतोष जेजूरकर :दोनच कर्मचारी आहेत का?

डॉ.भागवत कराड :अनेक वर्षापासून काही कामगार दैनिक वेतनावर होते त्यांना सेवेत कायम केले हा ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवायचा आहे. शासनाकडून मंजूरी मिळेल. नंतर कार्यवाही होईल.

श्री.जगताप संजय :१५ कर्मचारी निलंबीत केले त्यांचेसाठी शासनाकडे पत्र पाठवावे.

श्री.अ.रशिद खान :ठराव मंजूर करून शासनाकडे पाठवणार असेल तर मा.महापौर सर्व पदाधिकारी या सर्वांनी मिळून शासनाकडून मंजूरी आणावी.

सौ.लता दलाल : अशी ही दुरूस्ती करावी की, आजपर्यंत जे रोजंदारीवर कर्मचारी असतील, त्यांना ही कायमस्वरूपी करण्यात यावे. आरोग्य,शिक्षण,मालमत्ता या प्रमाणे विभाग निहाय यादी करून त्यांची यादी पाठवावी.

श्री.देसरडा प्रशांत :अनेक अधिकारी/कर्मचारी यांचे प्रलंबीत प्रश्न प्रशासनाकडे आहे. त्यात बारा वर्षाची वेतनश्रेणी, परिविक्षाधिन कालावधी, पदनाम दयायचे, चौकशी नंतर झालेल्या कार्यवाही इतर जे प्रश्न असतील ते का प्रलबींत आहे याचा पूढील सभेत अहवाल सादर करावा.

सौ.लता दलाल :१२ वर्षानंतरची समयवेतनश्रेणी देण्याबाबत मा.आयुक्तांनी आदेशीत केले होते परंतू खालचे अधिकारी यांनी त्यांचे आदेशाची अमंलबजावणी केली नाही.

श्री.अ.रशिद खान :काही कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालयात प्रकरण दाखल केले होते ते मागे घ्यावे नसता गुन्हा दाखल होईल असा निर्णय आला त्या कर्मचा-यांनी प्रकरण मागे घेतले त्याचा समावेश करून कार्यवाही करावी.

मा.महापौर :विषय क्र.१३६ दुरूस्ती सह मंजूर करण्यात येतो.आतापर्यत महापालिकेच्या विविध विभागात काम करणारे कर्मचारी ज्याचे विषय प्रलंबीत आहे त्यांनाही सेवेत कायम करण्यात यावे अशा प्रकारचा प्रस्ताव मंजूर करण्यात येतो या सोबतच १२ वर्षानंतरची वेतनश्रेणी,परीविक्षाधिन कालावधी किंवा इतर जे प्रश्न प्रलंबीत आहे,ते मार्गी लावावे या बध्दलचा पूर्ण अहवाल पुढील सर्वसाधारण सभेत ठेवावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार महापालिकेत क्युरेटर या पदावर श्री.सर्वेश नांद्रेकर व बुकींग कारकून श्री.शेख जावेद शेख अमजद यांचेसह महापालिकेच्या विविध विभागात अस्थायी स्वरूपात कार्यरत एकूण २६८ अस्थायी कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेमध्ये कायम करण्यास प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. १३७ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलास नगर स्मशान भुमीची जमीन सिटी सर्व्हे नं. १२४८८ मध्ये स्थित आहे. अशा जमिनीच्या उत्तर बाजूस असलेली जमीन सिटी सर्व्हे नं. १२४८७ जी पुर्णपणे खुली आहे. कैलास नगर स्मशान भुमी मध्ये येणाऱ्या अंत्ययात्रेस येणाऱ्या नागरिकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांना पार्किंग करण्यासाठी जागा उपलब्ध असावी अशा उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी १९७५ ते १९९५ पर्यंतच्या शहर विकास योजने अंतर्गत आराखडयामध्ये स्मशान भूमीसाठीच्या उपयोगासाठी अधिकृत करणे कामी आरक्षित करण्यात आली होती. स्मशान भूमी आरक्षणा ऐवजी रहिवाशी वस्ती झाली तर अंत्ययात्रेला येणाऱ्या नागरीकांच्या वाहनांना पार्किंगसाठी जागा उपलब्ध होणार नाही. यासाठी पार्किंगसाठी स्मशानभूमीचे आरक्षण सिटी सर्व्हे नं.१२४८७ या जागेवर सार्वजनिक उक्त प्रयोजनासाठी ठेवण्यात येवून उक्त जमिनीच्या संपादनाची कार्यवाही त्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था करून सुरू करावी असे निर्देश देण्यात यावे अशी सभागृहाला विनंती आहे.

सुचक : श्री.कैलास गायकवाड अनुमोदक : श्री.कचरू विश्वनाथ मोरे

मा.महापौर :हा प्रस्ताव विषय पत्रिकेतून वगळण्या संदर्भात दुरूस्ती सुचना काढून सर्व सदस्यांना कळविलेले होते हा प्रस्ताव वगळयास मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तुत प्रस्ताव वगळण्यास मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. १३८ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क यातील अ.क्र.१२ पेज नं.१७९ वार्ड क्र.५१ मध्ये विविध ठिकाणी पॅचवर्क करणे रक्कम रूपये ५ लक्ष ठेवण्यात आले आहे. तसेच स्लम भागात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातील अ.क्र.१ वार्ड क्र.५१ इंदिरानगर (दक्षिण) भागात खडीकरण करणे पेज नं.१८२ यासाठी ५ लक्ष रू.रक्कम ठेवण्यात आली आहे. या लेखाशिर्षातील कामाऐवजी इंदिरानगर प्रभाग क्र.५१ अंतर्गत रस्ता पुन:डांबरीकरण करणे या कामासाठी १० लक्ष एवढी तरतुद वळती करावी.

सुचक : श्री.कैलास गायकवाड अनुमोदक : सौ.शकुंतला इंगळे

मा.महापौर :विषय क्र.१३८ ते १४१ या सर्व विषयास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ या अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष रस्ते दुरूस्ती व पॅचवर्क यातील अ.क्र.१२ पेज नं.१७९ वार्ड क्र.५१ मध्ये विविध ठिकाणी पॅचवर्क करणे रक्कम रूपये ५ लक्ष तसेच स्लम भागात नवीन खडी रस्ते या लेखाशिर्षातील अ.क्र.१ वार्ड क्र.५१ इंदिरानगर (दक्षिण) भागात खडीकरण करणे पेज नं.१८२ यासाठी र.रू.५ लक्ष याकामाऐवजी इंदिरानगर प्रभाग क्र.५१ अंतर्गत रस्ता पुन:डांबरीकरण करणे या कामासाठी र.रू.१०.०० लक्ष तरतुद वळती करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९ :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ मधील लेखाशिर्ष विकास इमारती शाळा दवाखाने मधील अ.क्र.१४ पान क्र.W-३१ वरील इंदिरानगर,बायजीपुरा म.न.पा प्राथमिक शाळा खोल्याची वाढ करणे यासाठी ५ लक्ष तरतुद करण्यात आली होती. त्याऐवजी ०१. इंदिरानगर बायजीपुरा गटार दुरूस्ती करणे व चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे यासाठी ३ लक्ष रू. वळती करण्यात यावे तसेच ०२. इंदिरानगर प्रभाग क्र.५१ येथे लाईटची किरकोळ कामे करणे व वायर दुरूस्ती करणे यासाठी २ लक्ष रूपये वळती करण्यात यावे.

सुचक : श्री.कैलास गायकवाड अनुमोदक : सौ.शकुंतला इंगळे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००७-२००८ मधील लेखाशिर्ष विकास इमारती शाळा दवाखाने मधील अ.क्र.१४ पान क्र.W-३१ वरील इंदिरानगर,बायजीपुरा म.न.पा प्राथमिक शाळा खोल्याची वाढ करणे यासाठी असलेली र.रू.५.०० लक्ष तरतुद याऐवजी ०१. इंदिरानगर बायजीपुरा गटार दुरूस्ती करणे व चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे यासाठी र.रू.३.०० लक्ष तसेच ०२.इंदिरानगर प्रभाग क्र.५१ येथे लाईटची किरकोळ कामे करणे व वायर दुरूस्ती करणे यासाठी र.रू.२.०० लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४० :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यात यावे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

| | | |
|---|---|---|
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे-५.०० दि.२६.१०.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१२६४ नुसार-वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे या कामाकरीता रू.३.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहेत. (त्यापैकी रू.१.५० लक्ष रविंद्रनगर येथील नाल्यावर फुट ब्रीज बांधणेसाठी वळती करणे.) | १.वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-१.५० लक्ष.<br>२. रविंद्रनगर येथील नाल्यावर पादचारी पुल (फुट ब्रीज) बांधणे-१.५० लक्ष<br>३. बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे-२.०० लक्ष. |

सुचक : श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विविध कामासाठी अर्थसंकल्पातील तरतुदीत खालील दर्शविल्याप्रमाणे लेखाशिर्ष बदलण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| | | |
|---|---|---|
| W२१०/१७ | **लेखाशिर्ष-शहरी भागात खुल्या गटारी बांधणे**<br>प्रभाग क्र.५७ रेंगटीपुरा ते मोंढा येथील गटार दुरूस्ती करणे-५.०० दि.२६.१०.२००७ रोजीच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.१२६४ नुसार-वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे या कामाकरीता रू.३.०० लक्ष वळती करण्यात आलेले आहेत. (त्यापैकी रू.१.५० लक्ष रविंद्रनगर येथील नाल्यावर फुट ब्रीज बांधणेसाठी वळती करणे.) | १.वार्ड क्र.६६ शिवशंकर कॉलनी येथे विविध ठिकाणी ड्रेनेज दुरूस्ती, मेनहोल चेंबर दुरूस्ती व इतर फुटकळ कामे करणे-१.५० लक्ष.<br>२. रविंद्रनगर येथील नाल्यावर पादचारी पुल (फुट ब्रीज) बांधणे-१.५० लक्ष<br>३. बन्सीलालनगर अग्निशमन विभागाचे इमारतीस रंगरंगोटी करणे-२.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४१ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१७, एन-९,सिडको डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ.सो.,अलका नगरी हौ.सो. व चंद्र नगर हौ.सो. मधील नाल्यास संरक्षित भिंत बांधून नाला चॅनलिंग करणेच्या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा.खात्याच्या सन २००७-०८ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन अ.प.रक्कम रू.२४,७९,०००/- होत आहे. सदरील काम सर्वसाधारण सभा विषय/ठराव क्र.१२४ दिनांक ३१/०१/२००८ अन्वये वळती करण्यात आलेली तरतुद रू.१४.८० लक्ष आणि विशेष शासकीय अनुदानातून रू.१०.०० लक्ष असे एकुण २४.८० लक्ष या तरतुदीमधून प्रस्तावित आहे.

रक्कम रू.२४,७९,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.१७, एन-९,सिडको डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ.सो., अलका नगरी हौ.सो. व चंद्र नगर हौ.सो. मधील नाल्यास संरक्षित भिंत बांधून नाला चॅनलिंग करणेच्या कामाचे रक्कम रू.२४,७९,०००/- चे अंदाजपत्रकास मंजूरी देण्यांत येते. तसेच या कामासाठी सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२४ दिनांक ३१/०१/२००८ अन्वये वळती करण्यात आलेली तरतुद रू.१४.८० लक्ष आणि विशेष शासकीय अनुदानातून रू.१०.०० लक्ष असे एकूण र.रू.२४.८० लक्ष या तरतूदीमधून सदर काम करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. १४२ :</u>**

आयुक्त मा.सर्वसाधारण सभेसाठी प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद शहरात आर.सी.एच.फेज-२ प्रकल्प राबविण्यास सुरूवात झाली आहे. या प्रकल्पा अंतर्गत गरोदर माता व स्तनदा मातांची नोंदणी, ६ वर्षाखालील बालकांची नोंदणी व यांचेशी संबंधीत इतर सर्व नोंदी उदा.लसीकरण इत्यादी केली जाते. हा डाटा वारंवार अद्यावत करणे आवश्यक असते. या कामात व्यवस्थितपणा येण्यासाठी तसेच वेळोवेळी डाटा अद्यावत करण्यासाठी आर.सी.एच.-स्मार्ट हा प्रकल्प राबवायचा आहे. या प्रकल्पात संबंधीत लाभार्थींना माय कार्ड नावाचे स्मार्ट कार्ड देण्यात येईल हे कार्ड १६ केबी कॅपॅसीटीचे असेल त्यावर १ माता व ४ ते ५ मुलांचे रेकॉर्ड स्टोअर होवू शकते. हे कार्ड क्रेडीट कार्ड सारखेच असेल व त्यावर त्या लाभार्थींच्या आरोग्याबाबत सर्व नोंदी ठेवल्या जातील या प्रकल्पाची सविस्तर माहिती खालील प्रमाणे.

१. सुरूवातीला हे माय कार्ड ६ वर्षाखालील बालके असलेल्या सर्व मातांना महानगरपालिकेकडून मोफत दिले जाईल.
२. या कार्डवर मातेची व तीच्या सर्व मुलांचा आरोग्य विषयक डाटा उपलब्ध असेल व सेंट्रल सर्व्हरवर या सर्व कार्डचा एकत्रित डाटा उपलब्ध असेल.
३. आर.सी.एच. लिंक वर्कर यांचेकडे एक टर्मीनल असेल जे हे कार्ड रीड करू शकेल. व प्रत्येक लिंकवर्कर/ए.एन.एम/हेल्थ वर्कर गृह भेटी देऊन हा डाटा अद्यावत करतील व तो डाटा त्या माय कार्डवर अपलोड होत जाईल.
४. या माता किंवा बालके महानगरपालिकेच्या कोणत्याही आरोग्य केंद्र/रूग्णालयात गेल्यास व तेथे हे माय कार्ड दाखविल्यास त्या दवाखान्यात असलेल्या कॉम्प्युटरवर त्या मातेच्या किंवा बालकाच्या संबंधीत सर्व डाटा उपलब्ध होईल व त्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना त्या मातेचे किंवा बालकांचे संपूर्ण हेल्थ रेकॉर्ड उपलब्ध होईल.

५. भविष्यात शहरातील सर्व प्रौढ नागरीकांना हे कार्ड देण्याचा प्रयत्न असेल व शहरातील कुठल्याही हॉस्पीटल मध्ये हे कार्ड रिड करण्याचा भविष्यात प्रयत्न केला जाईल. नागरीकांनी या कार्डची सेवा घेतल्यास पुढील काळात आरोग्य विषयक विमा योजना जोडता येऊ शकतील.

६. या कार्डमुळे शहरातील वेगवेगळया आजारांची माहिती त्वरीत मीळेल तसेच कोणती साथ पसरली किंवा पसरण्याची शक्यता आहे याची सुध्दा माहिती त्वरीत मिळू शकेल.

करीता वरील बाबींचा विचार करता सदरील प्रकल्पास मंजुरी व स्मार्ट कार्ड, सेंट्रल सर्व्हर त्याचे मेंटनन्स व इतर बाबीसाठी र.रू.५० लाखाची तरतुद करण्यासाठी मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. यापैकी रू.५ लाख तरतुद सौर उर्जा उपकरणे खरेदी (२००७-२००८) यातून वळती करून उर्वरीत रू.४५ लाख तरतुद २००८-०९ च्या आर्थिक वर्षात करावी लागेल.

**<u>संवाद :</u>**

सौ.लता दलाल :प्रस्तावास विरोध नाही ५० लक्षची तरतूद ठेवलेली आहे आरसीएच युरोपीयन कमीशन किंवा शासनाकडून अनुदान येणार आहे त्यातून हा खर्च करण्यात यावा ही दुरूस्ती करावी.

श्री.संजय जोशी :आरसीएच फेज-२ चे मुळ कार्य काय आहे.

मा.आयुक्त : गरोदर माता व स्तनदा माता असते त्यांना व त्याचे बालकांना मेडीकल हेल्प देण्याची स्किम आहे.

श्री.संजय जोशी :आरसीएच चा अर्थ माता व लहान मुलांसाठी आरोग्य सेवा देणे. परंतु या ठरावात क्र.५ वर असे दिले की भविष्यात शहरातील सर्व प्रौढ नागरीकांना हे कार्ड देण्याचा प्रयत्न असेल हे आरसीएच मध्ये येते का? याचा अर्थ जे कार्ड देणार ते क्रेडीट कार्ड जसे क्रॅच केले जाते असे रिड करण्याचे मशीन असणार म्हणजे आरसीएचची मुळ संकल्पना सोडून वेगळा निर्णय घेण्याची भुमिका मांडत आहोत.

मा.आयुक्त :शहरात ज्या आरोग्य सेवा दिल्या जातात त्यात सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा आहे.टीबी पासून ते सर्व डीसीजसच्या बाबतीत आरोग्य केंद्रात उपचार केला जातो व ते करणे महापालिकेला बंधनकारक आहे.

श्री.संजय जोशी :प्रशासन पूर्ण शहरातील नागरीकांचा विचार करते परंतू आरसीएचच्या कायदयात हे बसते का ?

मा.आयुक्त :आरसीएचच्या नियमात बसते सुरूवातीला आरसीएच धारकांनाच त्यानंतर सर्व प्रोजेक्टला देणार आहोत.केंद्र शासन ,राज्य शासन व महापालिका १०० टक्के आरोग्य सेवा देते परंतू यात मोठा वाटा आरसीएचचा असतो.गरोदर माता तसेच सहा वर्षपर्यतच्या मुलांना चांगली आरोग्य सेवा मिळाली तर पुढील आयुष्य चांगले जाते.त्यामुळे आरोग्य केंद्रात ६०-७० टक्के हिस्सा आरोग्य सेवा देण्यात आरसीएच चा असतो. जी काही सुविधा दिली जाते त्यात ॲन्टीरेबीज पण असते,डेंग्यूची असते त्यातील ७० टक्के सेवा ही गरोदर माता तसेच लहान मुलांसाठी असते. शासनाने आरसीएच ही मोठी स्कीम तसेच त्यापेक्षा आणखी लहान स्किम पण आहेत. पुर्ण शहरातील १० लक्ष लोकसंख्या गृहीत घरता २ लक्ष कुटूंबांना हेल्थ कार्ड दयायचे आहे.या कार्डमध्ये त्या व्यक्तीची पुर्ण आरोग्य सेवेची माहिती राहील.या शहरात आजरोजी किती डेग्यू,इतर वेगवेगळया प्रकारचे आजाराचे रूग्ण आहेत याची माहिती तातडीने मिळेल. गरोदर माता तसेच मुलांचा कोणकोणत्या आरोग्य सेवा दिलेल्या आहे याचा पूर्ण डाटा आहे. सर्व प्रथम सीप्युटरमध्ये जात आहे यामूळे ८०-९० टक्के माता याचा डाटा समोर येतो पहिली स्टेज अशी की लेडीजला कार्ड दिले जाईल त्यानंतर शहरातील प्रत्येक कुटुंबासाठी कार्ड देणार त्यासाठी ५० रूपये लागतील व यामध्ये ६० केबीचे कार्ड देवू शकतो.

श्री.संजय जोशी :हे आरसीएच प्रकल्पाच्या अंतर्गत येत नाही हे वाक्य इतिवृत्तात नोंद करून घ्यावे.

मा.आयुक्त :आरसीएच ला पहिल्या टप्प्यात देत असून गरोदर मातांना अगोदर देणे महत्वाचे आहे.

श्री.संजय जोशी :आरसीएचच्या नावाखाली सर्वांना कार्ड देण्याचे मंजूरी दिली जात आहे हे चूकीचे आहे. यास वेगळे करावे सन २००८-०९वर्ष सुरू झाले नाही त्यातून या खर्चास मंजूर घेत आहे हे योग्य नसून जेंव्हा बजेट समोर येईल त्यावेळी सभागृहाला बोलण्याचा अधिकार असणार नाही.स्थायी समितीची बजेटला मान्यता नाही त्या अगोदरच मंजूरीसाठी सादर करणे योग्य नाही.कोणत्या कायदयानुसार मान्यता घेत आहे. अधिकारावर गदा आणत आहे.

मा.आयुक्त :कोणतीही ॲक्टीव्हिटीज एप्रिल मध्ये दयायची असेल व प्रोसेस सुरू करावी लागेल.कोणत्याही कायदयाचा भंग होत नाही. सभागृहासमोर सादर केलेले आहे आपले अधिकार वापरा समजून सांगत आहे.

श्री.संजय जोशी :आम्ही आमचा अधिकार वापरत आहे. माझ्या माहिती प्रमाणे हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.बजेट मंजूरीच्या वेळेस तरतूद केली जाईल नंतर ठेवावे.

मा.आयुक्त :काही खर्च पुढील वर्षीच्याच बजेट मध्ये येणारच आहे.ही स्कीम आंध्रप्रदेशला आहे. आरसीएचमध्ये अर्थसहाय्य घेण्याचा प्रयत्न आहे. संपूर्ण देशासाठी स्किम असल्यामूळे पैसे मिळतील की नाही याची खात्री नाही. महिलांना हेल्थ सेवेसाठी सिस्टम चांगली आहे.

सौ.अजरा जबीन :ही महिलासाठी चांगली स्किम आहे.

श्री.अ.रशिद खान :महिलावर अत्याचार होत आहे एकही महिला बोलण्यास तयार नाही.

श्री.प्रशांत देसरडा :गरोदर माता व ६ वर्षाच्या आतील मुलाचा कार्ड मध्ये डाटा येईल. एवढेच आउटपूट निघेल असे वाटते.६वर्षाचा मुलगा कायम ६ वर्षाचा असणार नाही गरोदर माता शेवटपर्यत गरोदर राहणार नाही अ.क्र.६ मध्ये नमुद केलेले चुकीचे वाटते, आजाराची साथ परसरत आहे हे कळाले असते तर कोणत्याही डॉक्टराचे काम राहणार नाही. ५० लक्ष खर्च येणार नाही. या कार्डमुळे शहराची आरोग्याच्या संदर्भात प्रगती होत असेल तर महापालिकेला आरोग्य सेवा देण्याची जबाबदारी कुठपर्यत आहे याचा विचार करावा लागेल. पहिल्या टप्प्यातीलच आरोग्य सेवा देण्याचे कर्तव्य महापालिकेचे आहे त्याशिवाय लाईट पाणी रस्ते या सुविधा देण्याचे कर्तव्य महापालिकेचे आहे.नागरीकांनी ५० रू.फिस देवून त्यांना कार्ड दयावे डाटा तयार करावा ५० लक्ष महापालिकने खर्च करू नये. हा प्रोजेक्ट साध्य झाल्यात नागरीक ५० रू.देवून कार्ड विकत घेतील.हा प्रकल्प इतर कोणत्या महापालिकेत राबविला जात आहे तेथे जेष्ठ सदस्य व अधिकारी यांना पाठवून माहिती घेण्यास आदेशीत करावे. तोपर्यत हा प्रस्ताव स्थगित ठेवावा.ज्या ज्या मोठया योजना राबवित आहे यासाठी महापालिकेने किती खर्च करायचा या बाबतीत सर्व पदाधिकारी व प्रशासन मिळून एक धोरण ठरवायला पाहिजे

सौ.अजरा जबीन :ही स्कीम चांगली आहे परंतू महापालिकेकडील आरोग्य केंद्रात कार्यरत असलेले कर्मचारी काय काम करणारआहे. कोणत्या पध्दतीने हे राबविणार आहे की बीओटीवर देणार आहे. महापालिकेचे कोणतेही काम तीन वर्षापासून कोणत्यान कोणत्या कारणाने बीओटीवर केले जात आहे. बीओटीवर न देता महापालिकेच्याच कर्मचा-याकडून काम करून घ्यावे बीओटीवर दिलेले लाईटचे काम व इतर कोणतेही काम बरोबर होत नाही. स्कीम सादर केली जाते मंजूरी घेवून सुरू केल्यानंतर शेवटी बीओटीवर दिले जाते ही पध्दत चुकीची आहे. महापालिकेच्या माध्यमातून सुरू करावे सर्व नागरीकांना फायदा होईल.

श्री.कैलास गायकवाड :आरसीएच दूसऱ्या टप्प्याच्या प्रकल्पासाठी युरोपीयन कमीशन कडून किती निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

मा.आयुक्त :आता युरोपीयन कमीशनचा कोणताही प्राजेक्ट चालू नाही. पूर्ण देशात औरंगाबाद महानगरपालिका होती. आरसीएच-१ त्यानंतर आरसीएच-२ लागू झाले होते. म्हणून मागिल १ एप्रिलला संपलेले आहे. १ एप्रिल २००७

पासून आरसीएच-२ चा प्रस्ताव आहे.जो काही गेटचा २१ लक्षचा प्रस्ताव येत आहे तो सर्व खर्च महाराष्ट्र शासनाकडून स्पेशल फंड गेटसाठी येत आहे त्यातून होणार आहे. स्ट्रीट लाइट ५ हजार बीओटीवर पांढले लाईट आहे. ते प्रशासनाच्या मते योग्य आहे. जे देखभाल दुरूस्ती आहे त्याचा बीओटीशी संबंध नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :जे जे खाजगी एजन्सीला काम दिले त्या ठिकाणी किती वेळेस प्रशासनाने भेट दिली. कुठे लाईट बंद आहे अभियंता येत नाही. जनतेला सुविधा मिळत नाही नगरसेवकांना विश्वासात घेतले जात नाही हे बरोबर नाही.

मा.आयुक्त :यात कुटूंबास एक कार्ड देणार सुरूवातीला आरसीएचच्या अंतर्गत गरोदर माता व मुलासाठी देत आहोत कारण १०० टक्के जे काम करतो त्यापैकी ७० टक्के हे आरसीएचच्या मध्येच येते.दोन लक्ष कुटूंबांना कार्ड दयायचे आहे. मुलाचे वय वाढले तर काही फरक पडत नाही जेंव्हाही ज्या दवाखान्यात व्यक्ती जाईल तेथे त्या व्यक्तीची कार्ड नुसार बेसीक माहिती दिसेल. लहान मुल असेल तर त्याची वॅक्सीनेशनची पूर्ण माहिती मिळेल. जे उपचार घेतले ते त्यात ॲड होणार दुस-यादां जर काही आजार झाल्यास डॉक्टरकडे गेल्यास त्यांना त्या कार्डद्वारे पुर्ण माहिती मिळेल. या कार्डचा इंटरनेटवर डाटा बेस राहिल त्यामूळे कोणत्याही क्षणी या शहरात कोणत्या आजाराचे किती रूग्ण कोणत्या भागातील आहेत याची माहिती मिळेल. जे ५० रू.लागणार आहे असा विचार होता की बीपीएलचे जे लोक आहे त्यांना मोफत देवू इतर जे आहे त्यांना पेमेन्टवर देवू सुरूवातीला ८८हजार लोकांचा डाटा असल्यामूळे ५० रूपये प्रमाणे देण्यासाठी जवळपास ५० लक्ष रूपये लागतील.त्याची मागणी करीत आहे.प्रत्येकाकडे हेल्थ कार्ड असणार त्यात सर्व माहिती असणार हे कार्ड ऑलमोस्ट लाईफ सेव्हींग होवू शकते. कार्ड देतांना प्राव्हेटेशनचे बेसीस का राहिल तर डाटा बेस मॅनेजमेन्ट एक खाजगी एजन्सी करेल ही स्कीम एक दीड वर्षापासून तयार करीत आहेत. डाटा तयार नव्हता म्हणून ही स्कीम चालू करणे शक्य नव्हते. २६ जाने. २००८ पासून सुरूवात केली ८८ हजार लोकांचा डाटा आज आहे. त्यावर अमलबजावणी करणे शक्य आहे. या राज्यात इतर महापालिकेत कुठेही नाही आंध्रप्रदेश मध्ये हा प्रकल्प चालू आहे. त्यानी जे आरसीएच आहे त्यास लिमीटेड केले आहे.कोणती मुले ६ वर्षापेक्षा जास्त झालेली आहे त्यांनी फस्ट ॲडमीनेशन घ्यायला पाहिजे यामूळे शिक्षणाच्या संदर्भात ही लिकींग होईल. प्रशासनाला खात्री आहे की हा प्राजेक्ट सक्सेसफुल करू शकेल. कोणत्याही क्षणी कोणत्या आजाराचे किती लोक आहे ही माहिती मिळेल आज माहिती घ्यायची झाल्यास सर्वच ठिकाणी कर्मचारी यांना पाठवून माहिती जमा करावी लागते त्यास खर्च ही जास्त येतो. हीकार्यवाही करतांना खाजगी हॉस्पीटलची पण गरज लागेल कारण तेथेही लोक उपचारासाठी जातात टीपीए जे मेडीकलचे असतात ज्यांच्या सर्कीट मध्ये खाजगी हॉस्पीटल असतात त्यामार्फत अमलबजावणी करण्याचा विचार आहे. हे हॉस्पीटल आपोआप लिकींग मध्ये येतील. इतर मोठे हॉस्पीटल जे आहे ते या सीस्टममध्ये येण्यास तयार आहे. पुर्ण फ्रॉन्स स्टेट या स्कीम मध्ये आहे. याची अमलबजावणी करू शकलो तर महाराष्ट्रात ही महापालिका पहिली राहिल. ८ एप्रिलला ही स्कीम लॉच करू या ५० लक्ष चा खर्च एकदम पडणार नाही ५० रू.हे कार्ड विकले जाईल महापालिकेला खर्च येणार नाही १० लक्ष फक्त डाटा बेस साठी मंजूर करावे कार्ड विकण्यास सुरूवात होईल.

श्री.संजय जोशी :भविष्यासाठी ५० लक्ष खर्च करत आहे परंतू जेचांगले लोक आहे त्यांचेसाठी विकास कामे करावी. अमरप्रित ते बीडबायपास दर्गापर्यत पॅचवर्क करावे म्हणून अनेक वेळा मागणी केली १ लक्ष खर्च करू शकत नाही. हेच ५० लक्ष रस्त्यासाठी खर्च केले शहर जगाच्या नकाशावर दिसेल. या ठरावानुसार डाटा बेस नुसार माहिती मिळेल हे जरी सत्य असले तरी जी नागरीकांसाठी

विकास कामे थांबलेली आहे ती अगोदर करावी. त्यानंतर लोकांच्या आरोग्याचा विचार करावा असे वाटते.

मा.आयुक्त :रस्त्याची जेवढी गरज आहे तेंवढीच आरोग्याची पण आहे. आजही २९ टक्केपेक्षा जास्त महिलांना १०० टक्के सेफ आहे असे म्हणू शकत नाही. १०० टक्के वॅक्सीनेशन माता व मुलांना मिळत नाही. २९ टक्केवरून १०० टक्के पर्यत घेवून जायचे असेल तर या ठरावाविषयी विचार करावा.

श्री.संजय जोशी : माता व मुलांसाठी हा प्रकल्प नाही दोन्ही एकत्र करू नये आरसीएच प्रकल्पास विरोध नाही परंतू इतरही त्यात अॅड केले त्यास विरोध आहे.

श्री.देसरडा प्रशांत :पुढीलवर्षाचे बजेट आताच वापरता येते का,हाप्रोजेक्ट करणे गरजेचे आहे का?

मा.आयुक्त :पुढील वर्षाचे बजेट घेवू शकतो तसेच महापालिकेने ही योजना करणे आवश्यक आहे.

श्री.अ.रशिद खान :ज्यांना तीन चार आपत्य असल्यास सर्वासाठी उपचार करणार काय?

मा.आयुक्त :संगळयासाठी उपचार करावा लागेल.

श्री.संजय जोशी :माता व मुलांसाठीच ठेवावे जनरलाईज करू नये.

मा.आयुक्त :सुरूवातीलाच मातासाठी देत आहोत त्यानंतर सर्वासाठी करावयास पाहिजे.सध्या ८८ हजार लोकांचे डाटा बेस तयार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :सर्वांसाठी करावे परंतू महापालिकेचा १० टक्केच खर्चाचा हिस्सा ठेवावा लागेल ५० रू. कार्ड नागरीकांनी विकत घ्यावे.

